# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०११
## प्रारुप विनियम

**अनुक्रमणिका**

**भाग एक : प्रारंभिक**

| | |
|---|---|
| १. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ | १ |
| २. व्याख्या | २ |
| ३. मुक्त प्रवेश मागण्यासाठी पात्रता आणि नोडल एजन्सी | ७ |
| ४. वितरण मुक्त प्रवेशासाठी आलेल्या अर्जाची छाननी | १० |
| भाग बी : विजेची जोडणीयता | १६ |
| ५. जोडणीयता मंजूर करणे | १६ |
| भाग सीः मुक्त प्रवेशासाठी सर्वसाधारण तरतुदी | २० |
| ६. करार | २० |
| ७. जागा आणि मालमत्तेमध्ये प्रवेश | २२ |
| ८. मुक्त प्रवेशाची वर्गवारी | २३ |
| ९. मुक्त प्रवेशासाठी अर्ज करण्याची कार्यपध्दती | २५ |
| १०. दीर्घकालीन प्रवेशासाठी कार्यपध्दती | ३३ |
| ११. मध्यम-कालीन प्रवेशासाठी कार्यपध्दती | ३८ |
| १२. अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपध्दती | ४१ |
| १३. वितरण परवानाधारकाची मान्यता | ४७ |
| १४. थकबाकीदारांच्या अर्जाचा विचार करणे | ४९ |
| १५. वाटपासाठी प्राधान्य | ४९ |
| भाग डीः मुक्त प्रवेशाचे आकार | ५० |
| १६. देयक तयार करणे | ५० |
| १७. वहन आकार | ५२ |
| १८. क्रॉस सबसिडी अधिभार | ५३ |
| १९. अतिरिक्त अधिभार | ५७ |

२०. वितरण परवानाधारकाकडून मुक्त प्रवेश ग्राहकाने विजेचा वापर करण्यासाठी
स्टॅण्ड बाय आकार ५९
२१. सुरक्षा अनामत ६०
२२. आकारणीची तत्व ६२
२३. राज्य ग्रिड संहितेचे पालन ६२
भाग इः काल व परिमाण निर्धारण, मीटर मोजणी, सुधारणा आणि हानि ६३
२४. काल व परिमाण निर्धारण ६३
२५. मीटरच्या नोंदी व संदेशवहन ६३
२६. सुधारणा ६६
२७. हानि ६६
भाग एफः असंतुलन आणि रिॲक्टिव्ह ऊर्जा आकार ६७
२८ असंतुलन आकार ६७
२९ रिॲक्टिव्ह आकार ७६
भाग जीः वाणिज्यिक बाबी ७६
३०. देयक, तयार करणे, वसुली आणि वाटप ७६
३१. विलंब भरणा अधिभार ७७
३२. देयक अदा न करणे ७९
३३. भरणा सुरक्षा पध्दत ७९
३४. वीज पुरवठा करण्याची आणि वापराची ठिकाणे बदलण्यात लवचिकता ७९
भाग आयः माहिती यंत्रणा ८१
३५ माहिती प्रणाली ८१
भाग जेः वितरण प्रणालीशी जोडलेल्या निर्मिती केंद्राला मुक्त प्रवेश ८२
३६. व्याप्ती ८२
३७. अर्जाची छाननी ८३
भाग केः संकीर्ण ८६
३८. पारेषण परवानाधारकाच्या हरकती ८६
३९. मुक्त प्रवेश कमी करण्यासाठी प्राधान्य ८९
४०. विद्यमान करार ८९

| | |
|---|---|
| ४१. वाद | ९० |
| ४२. दैवी आपत्ती | ९१ |
| ४३. अपवाद | ९२ |
| ४४. दुरुस्ती करण्याचे अधिकार | ९२ |
| ४५. अडचणी दूर करण्याचे अधिकार | ९२ |
| ४६. रद्द करणे व अपवाद | ९३ |

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०११

<u>**प्रारुप विनियम**</u>

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/लिगल/ – विद्युत अधिनियम, २००३ (२००३चा ३६) च्या कलम १८१ च्या उप कलम (२) मधील खंड (के) खंड (एन) खंड (पी), खंड (क्यू) आणि खंड (झेडपी) सह कलम २ चे उप-कलम (४७), कलम ३९ च्या उप-कलम (२) च्या खंड (डी)चे उप-खंड (दोन), कलम ४० च्या खंड (सी)चे उप-खंड ((दोन) आणि कलम (४२) च्या उप-कलम (२), उप-कलम (३) आणि उप-कलम (४) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, राज्यातील वितरण यंत्रणेमध्ये वितरण मुक्त प्रवेश (ओपन ॲक्सेस) सुरु करण्यासाठी पुढीलप्रमाणे विनियम करीत आहे. हे विनियम "महराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश ) विनियम, २००५" ला अधिक्रमित करतील.

## भाग-१ प्रारंभिक

### १. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती व प्रारंभ

१.१ या विनियमांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०११ असे म्हणावे.

१.२ हे विनियम महाराष्ट्र राज्यातील वितरण परवानाधारकांच्या वितरण यंत्रणेत प्रवेशासाठी व वापरासाठी लागू राहतील.

१.३ हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

## २. व्याख्या

२.१ संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर, या विनियमांमध्ये -

(ए) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(बी) **"अर्जदार"** म्हणजे या विनियमांनुसार वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत जोडणी मिळण्यासाठी आणि/किंवा त्यात मुक्त प्रवेश मिळण्यासाठी ज्याने अर्ज केला आहे अशी व्यक्ती;

(सी) **"प्राधिकृत प्रतिनिधी"** म्हणजे वितरण परवानाधारक किंवा पुरवठादार, जसे असेल तसे, यांच्या सर्वसाधारण किंवा विशिष्ट प्राधिकाराखाली कार्ये करीत असलेले वितरण परवानाधारकाचे सर्व अधिकारी, कर्मचारी किंवा प्रतिनिधी;

(डी) **"संतुलन व हिशोबपूर्तीची संहिता (Balancing and Settlement Code)"** म्हणजे महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने विकसित केलेली आणि आयोगाने मान्यता दिलेली अशी संहिता जिच्यानुसार महाराष्ट्र राज्यांतील ग्रिडचा वापर करणा-यांच्या ऊर्जेच्या लेख्यांमध्ये आवश्यक अशी देवाण-घेवाण करण्यात येईल व त्यांच्या निर्धारित व प्रत्यक्ष वापरलेली ऊर्जा यांच्यातील फरकाचा हिशोब पूर्ण करण्यात येईल;

(इ) **"मंडळ"** म्हणजे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ;

(एफ) **"केंद्रीय आयोग"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ७६ मध्ये संबोधिलेला केंद्रीय विद्युत नियामक आयोग;

(जी) **"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(एच) **"जोडणी"** म्हणजे संबंधित जागा आणि वितरण यंत्रणा यांच्यामध्ये विजेचे हस्तांतरण करता येणे शक्य व्हावे याकरिता कनेक्टरची जागा वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेशी जोडणे;

(आय) **"वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी करार"** म्हणजे वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेला जोडण्यासाठी व यंत्रणेचा वापर करण्यासाठी-

(एक) असा वितरण परवानाधारक,

(दोन) वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात जागा असलेली व जिला अशा वितरण परवानाधारका व्यतिरिक्त अन्य परवानाधारकाकडून किंवा वीज निर्मिती कंपनीकडून वीज पुरवठ्याची गरज आहे अशी व्यक्ती,

(तीन) विजेच्या वहनासाठी अशा वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा वापर करुन, अशा व्यक्तीला विजेचा पुरवठा करण्यास इच्छुक असलेली निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक, जसे असेल तसे,

(चार) वेळोवेळी अंमलात असलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (विद्युत बाजारपेठ) विनियम, २०१०, अंतर्गत पॉवर एक्स्चेंजमधून, अन्य सभासदामार्फत किंवा स्वतः सभासद होऊन, जिची वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात जागा आहे अशी वीज पुरवठ्याची गरज असणारी व्यक्ती,

यांच्यामध्ये या विनियमांनुसार आणि त्यातील अटी व शर्तीना अधीन राहून करण्यात आलेला करार.

(जे) **"जोडणीयता"**- स्व-वापरसाठीचा निर्मिती प्रकल्प, ग्राहक किंवा परवानाधारकासह निर्मिती केंद्राकरिता **"जोडणीयता"** म्हणजे वितरण यंत्रणेला जोडून घेण्याची अवस्था;

(के) **"कनेक्टर"** म्हणजे वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारान्वये ज्याने जोडणी मिळविली आहे अशी व्यक्ती;

(एल) **"ग्राहक"** याचा अर्थ अधिनियमाप्रमाणेच राहील परंतु तो, महाराष्ट्र राज्यातील ज्या ग्राहकांना हे विनियम लागू होत असतील त्यांच्यापुरता, मर्यादित राहील;

(एम) **"ग्राहक गा-हाणे निवारण मंच"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप-कलम(५) आणि त्याखाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विनियमातील तरतूदीनुसार वितरण परवानाधारकाने गा-हाण्यांच्या निवारणासाठी स्थापन केलेला मंच;

(एन) **"करारांतर्गत मागणी"** म्हणजे किलोवॅट (के-डब्लू) किंवा अश्व-शक्ति (एचपी) किंवा किलोव्होल्ट ॲम्पीअर (केव्हीए) किंवा मेगाव्होल्ट ॲम्पीअर (एमव्हीए) मधील विजेची मागणी जी -

(एक) वीज पुरवठ्याच्या करारात नोंदल्याप्रमाणे असेल; किंवा

(दोन) वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारात नोंदल्याप्रमाणे असेल; किंवा

(तीन) लेखी पत्रव्यवहारात मान्य केल्याप्रमाणे असेल;

(ओ) **"क्रॉस सबसिडीची सध्याची पातळी"** म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता, वीज दराची वर्गवारी/उप-वर्गवारी/वीज दरातील टप्प्याकरिता, विजेच्या विक्रीपासून मिळणारा मान्यता प्राप्त महसूल आणि अशा वीज दराची वर्गवारी/उप-वर्गवारी/वीज दरातील टप्प्याकरिता वीज पुरवठ्याचा मान्यताप्राप्त खर्च यामधील, धन संख्येत असलेला, फरक जो वितरण परवानाधारकाच्या प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता, प्रत्येक मान्यताप्राप्त वीज दराची वर्गवारी आणि / किंवा वीज दराची उप-वर्गवारीकरीता, आणि किंवा प्रत्येक वीज दराच्या वर्गवारी/ उप-वर्गवारीतील प्रत्येक वीज दराच्या टप्प्याकरीता, असेल;

परंतु असे की, आकडेवारीची उपलब्धता, आकडेवारीची विश्वासार्हता आणि अन्य संबंधित घटक विचारात घेऊन, आयोगाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या पद्धतीचा वापर करुन वीज पुरवठ्याच्या खर्चाची परिगणना करण्यात येईल;

परंतु आणखी असे की, आयोग राज्यातील निरनिराळ्या वितरण परवानाधारकांकरिता, वीज पुरवठ्याच्या खर्चाची परिगणना करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींना मान्यता देईल किंवा सर्व वितरण परवानाधारकांकरिता एकाच समान पद्धतीस मान्यता देईल;

परंतु असेही की, विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा वीज दरांच्या विनियमांनुसार नियंत्रण करण्यासारख्या नसलेल्या घटकांमुळे झालेल्या तफावतीच्या मर्यादेपर्यंत, ज्यास आयोगाकडून मान्यता दिलेली असेल, क्रॉस सबसिडीच्या सध्याच्या पातळीचे समायोजन करण्यात येईल;

(पी) **"दिवस"** म्हणजे रात्री बारा (००.०० वाजता) पासून सुरु होणारा २४ तासांचा कालावधी;

(क्यू) **"सविस्तर कार्यपद्धत"** म्हणजे येथील विनियम ८,९,१०,११,१२ आणि ४६ मध्ये उल्लेख केल्यानुसार वितरण परवानाधारकाने प्रसिध्द केलेली कार्यपद्धत.

(आर) **"विद्युत पुरवठा संहिता"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ च्या उपकलम (२) च्या खंड (यू), खंड (व्ही), खंड (डब्ल्यू), खंड (एक्स) आणि खंड (झेडपी) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले विनियम.

(एस) **"आय इ जी सी"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ७९ च्या उप-कलम १च्या खंड (एच्) अंतर्गत केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केलेली आणि वेळोवेळी सुधारणा केलेली इंडियन इलेक्ट्रीसिटी ग्रिड कोड;

(टी) **"असंतुलन"-** निर्मिती केंद्राच्या वेळेच्या एका गटाकरिता असंतुलन म्हणजे केंद्राची एकूण प्रत्यक्ष वीज निर्मिती वजा एकूण निर्धारित वीज निर्मिती आणि ग्राहक किंवा खरेदीदारासाठी असंतुलन म्हणजे त्याचा विजेचा एकूण वापर वजा एकूण निर्धारित वापर;

(यू) **"दीर्घ-कालीन प्रवेश"** म्हणजे १२ वर्षापेक्षा जास्त पंरतू २५ वर्षापेक्षा जास्त नसेल, अशा कालावधीकरिता राजांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

(व्ही) **"कमाल मागणी"-** आयोगाने कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशात तरतूद केली नसल्यास, कोणत्याही कालावधीच्या संबंधात किलोवॅटस किंवा किलोव्होल्ट-ॲम्पीअर मधील **"कमाल मागणी"** म्हणजे, सगळ्यात मोठ्या किलोवॅट-तासांच्या किंवा किलोवॅट ॲम्पीअर-तासांच्या संख्येमध्ये केलेल्या वीज पुरवठ्याची दुप्पट आणि त्याकालावधीत कोणत्याही सतत तीस (३०) मिनिटाच्या गटामध्ये घेतलेला विजेचा पुरवठा;

(डब्लू) **"मध्यम-कालीन प्रवेश"** म्हणजे ३ महिन्यांपेक्षा जास्त पंरतू ३ वर्षांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीकरिता राजांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

(एक्स) **"महिना"** म्हणजे ग्रेगोरियन कॅलेंडरप्रमाणे १ कॅलेंडर महिना;

(वाय) **"नोडल एजन्सी"** म्हणजे या विनियमांच्या विनियम ३ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली नोडल एजन्सी;

(झेड) **"मुक्त प्रवेश ग्राहक"** म्हणजे ज्याला या विनियमांतर्गत मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे असा ग्राहक, परवानाधारक किंवा निर्मिती कंपनी किंवा व्यक्ती;

(एए) **"अल्प-कालीन मुक्त प्रवेश"** म्हणजे एकावेळेस तीस (३०) दिवसांपेक्षा जास्त नसेलेल्या कालावधीकरिता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

(बीबी) **"राज्य भार प्रेषण केंद्र"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप-कलम(१) अंतर्गत महाराष्ट्रात स्थापन करण्यात आलेले राज्य भार प्रेषण केंद्र;

(सीसी) **"राज्य ग्रिड संहिता"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ८६ च्या उप-कलम(१) च्या खंड (एच) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेली व वेळोवेळी सुधारणा केलेली राज्य ग्रिड संहिता, जी हे विनियम सुरु झाल्याच्या दिनांकाच्या दिवशी लागू असेल;

(डीडी) **"राज्य पारेषण कंपनी(एसटीयू)"** म्हणजे अधिनियमच्या कलम ३९ च्या उप-कलम (१) अंतर्गत महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेली शासकीय कंपनी;

(ईई) **"विशेष एनर्जी मीटर"** म्हणजे केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या आणि वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे व चालविणे) विनियम २००६ नुसार बसविलेले मीटर;

(एफएफ) **"कृतीची मानके विनियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ च्या उप-कलम(२) च्या खंड (झेडए) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले विनियम

(जीजी) **"पुरवठादार"** म्हणजे वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात त्याच्या वितरण यंत्रणेचा वापर करुन, वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात स्थित असलेल्या ग्राहकाला किंवा व्यक्तीला, वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारानुसार, विजेचा पुरवठा करणारी वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक, जसे असेल तसे;

(एचएच) **"पुरवठा करार"** म्हणजे संबंधीत पक्षकारांनी मान्य केलेल्या अटी व शर्ती नुसार पुरवठादार आणि ग्राहक किंवा व्यक्ती यांच्यात विजेचा पुरवठा करण्यासाठी झालेला करार किंवा व्यवस्था;

(आयआय) **"वीज दराचे विनियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ च्या उप-कलम(२) च्या खंड(झेडडी) सह कलम ६१ अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले विनियम;

(जेजे) **"पारेषण मुक्त प्रवेश विनियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम २ च्या उप-कलम (४७) सह कलम ३० आणि कलम ३२ च्या उप-कलम(३) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले विनियम.

२.२ या विनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द आणि उक्ती परंतू ज्यांची व्याख्या अधिनियमात किंवा आय इ जी सी किंवा राज्य ग्रिड संहिता किंवा विद्युत पुरवठा संहिता किंवा त्याखालील करण्यात आलेल्या नियम आणि विनियमात करण्यात आलेली असेल तर अशा शब्द व उक्तींचा अर्थ, अधिनियमात किंवा आय इ जी सी किंवा राज्य ग्रिड संहिता किंवा विद्युत पुरवठा संहिता किंवा त्याखालील करण्यात आलेल्या नियम आणि विनियमामध्ये, जसे असेल तसे, देण्यात आलेल्या अर्थानुसार असेल.

## ३. मुक्त प्रवेश मागण्यासाठी पात्रता व नोडल एजन्सी

३.१ वितरण परवानाधारकाचा ग्राहक अशा वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेशासाठी, अशा वितरण परवानाधारका व्यतिरिक्त अन्य निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाकडून विजेचा पुरवठा मिळविण्यासाठी, खालील पात्रता शर्तीनुसार, पात्र राहील -

| ग्राहकाची करारांतर्गत मागणी | अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप-कलम (२) अंतर्गत कोणत्या दिनांकास मुक्त प्रवेशासाठी परवानगी देण्यात येईल |
|---|---|
| १ एमव्हीएपेक्षा कमी असेल तर | आयोगाच्या मान्यतेस अधीन राहून या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून |

परंतु असे की, ज्या ग्राहकाची मागणी १ एमव्हीएपेक्षा कमी असेल असा ग्राहक तो ज्या वितरण परवानाधारकाला जोडलेला असेल त्याच्या वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेश मागण्यासाठी आयोगाची परवानगी घेईल.
परंतु असे की, या विनियम ३.१ खाली मुक्त प्रवेशास परवानगी देण्यात आलेली आहे त्या दिनांकास किंवा त्यानंतर, जेव्हा करारांतर्गत मागणी वर नमूद केल्याप्रमाणे सुरुवातीच्या पातळी इतकी किंवा त्यापेक्षा जास्त होईल त्या दिनांकापसून, असा ग्राहक अशा वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेशासाठी पात्र राहील.

परंतु आणखी असे की, ग्राहक नसेल अशा व्यक्तीला, ज्याची जागा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात असेल, अशा वितरण परवानाधारका व्यतिरिक्त अन्य वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाकडून विजेचा पुरवठा हवा असेल तर अशी व्यक्ती, जर व्यक्तीने अशा वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाकडे केलेल्या अर्जात मागणी केलेला विद्युत भार, या विनियम ३.१ खाली मुक्त प्रवेशास परवानगी देण्यात आलेली आहे त्या दिनांकास किंवा त्यानंतर, वर नमूद केल्याप्रमाणे सुरुवातीच्या पातळीपेक्षा जास्त असल्यास, वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेशासाठी पात्र राहील.

परंतु असेही की, अशा ग्राहक किंवा व्यक्तीला मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आल्यानंतर प्रत्येक आर्थिक वर्षातील त्याची कमाल मागणी, तो ज्यावेळी मुक्त प्रवेशास पात्र झाला असेल त्यावेळी असलेल्या सुरुवातीच्या पातळीच्या ऐशी (८०) टक्क्याइतकी किंवा त्यापेक्षा जास्त राहील व असे न झाल्यास, अशा ग्राहक किंवा व्यक्तीला, जसे असेल तसे, देण्यात आलेली मुक्त प्रवेशाची सुविधा काढून घेण्याचा हक्क वितरण परवानाधारकाला राहील.

परंतु असेही की, सुरुवातीच्या पातळीच्या ऐशी (८०) टक्क्यांइतकी किंवा त्यापेक्षा जास्त कमाल मागणी नसल्याच्या कारणास्तव, ग्राहक किंवा व्यक्तीची मुक्त प्रवेशाची सुविधा काढून घेण्यात आली आसेल तर अशी ग्राहक किंवा व्यक्ती, जसे असेल तसे, ज्या आर्थिक वर्षात किंवा त्याच्या ज्या भागात अशी कमाल मागणी ठेवण्यात आली नसेल त्या कालावधीकरिता, अशा ग्राहकाच्या वर्गवारीला लागू असलेल्या मागणी आकारांच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून वितरण परवानाधारकाला अदा करण्यास, जबाबदार राहील.

३.२ आयोग, वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेमध्ये, वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाच्या मुक्त प्रवेशाला परवानगी देईल ज्यामुळे वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात जागा असलेल्या ग्राहकाला किंवा व्यक्तीला विजेचा पुरवठा करता येईल. असा मुक्त प्रवेश ज्या दिनांकाला असा ग्राहक किंवा व्यक्ती, जिला विजेचा पुरवठा करावयाचा आहे, वरील विनियम ३.१ नुसार मुक्त प्रवेश मिळण्यास पात्र झाली असेल त्या दिनांकापासून, देण्यात द्येईल;

परंतु असे की, ज्या वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेमध्ये मुक्त प्रवेश द्यावयाचा आहे त्याच्याकडे पात्र ग्राहक किंवा व्यक्तीकडून, या विनियम ३.२ अंतर्गत मुक्त प्रवेश मिळण्यासाठी अर्ज करण्यात येईल.

३.२.१ आयोग, वरील विनियम ३.१ नुसार मुक्त प्रवेशाला पात्र झालेल्या ग्राहकाला, पॉवर एक्स्चेंजचा 'सदस्य' म्हणून किंवा अन्य कोणत्याही पॉवर एक्स्चेंजच्या सदस्याकडून वीज मिळविण्यासाठी, वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेमध्ये मुक्त प्रवेश घेण्यास परवानगी देईल.

परंतु असे की, 'सदस्य' या संज्ञेचा अर्थ वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (विद्युत बाजारपेठ) विनियम, २०१० च्या विनियम २६ (एक) (सी) खाली व्याख्या केल्याप्रमाणे पॉवर एक्स्चेंजचा 'व्यावसायिक सदस्य' असा नसेक किंवा त्याचा समावेश नसेल;

३.३ मुक्त प्रवेश देण्यास सुरुवात केल्यानंतर मिळालेल्या अनुभवाच्या आधारे आणि/किंवा १ एमव्हीएपेक्षा कमी करारांतर्गत मागणी असलेल्या ग्राहकांकरिता मुक्त प्रवेश कार्यान्वित करताना येणा-या व्यवहारातील अडचणीसह, असल्यास, सर्व संबधित घटक विचारात घेऊन, आयोग, या विनियम ३ मध्ये उल्लेख केलेल्या शर्तींचे पुनर्विलोकन, सुधारणा किंवा फेरफार, शर्तींसह किंवा शर्तींशिवाय, करेल,

३.४ <u>नोडल एजन्सी</u>

३.४.१ ग्राहक आणि किंवा वीज निर्मिती कंपनी ज्या वितरण परवानाधारकाला जोडलेली असतील तो वितरण परवानाधारक त्याच्या वितरण यंत्रणेमध्ये जोडणी, दीर्घ-कालीन प्रवेश, मध्यम-कालीन प्रवेश आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठी नोडल एजन्सी असेल.

## ४. वितरण मुक्त प्रवेशासाठी आलेल्या अर्जांची छाननी

४.१ या सोबतच्या जोडपत्र-१ मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यामध्ये वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेमध्ये मुक्त प्रवेश मिळण्यासाठी अशा वितरण परवानाधारकाकडे अर्ज करण्यात येईल.

परंतु असे की, अर्जाच्या छाननीसाठी आवश्यक तपशील/कागदपत्रे आणि वितरण परवानाधारकाने विनिर्दिष्ट केलेल्या शुल्कासह, जे अर्जदाराच्या गरजा विचारात घेता वाजवी असेल, असा अर्ज करण्यात येईल;

परंतु आणखी असे की, ग्राहकाने/ व्यक्तीने वितरण यंत्रणेमध्ये मुक्त प्रवेशासाठी करावयाच्या अर्जासोबत पाठवावयाची आवश्यक माहिती, कार्यपध्दत, अर्जाचे नमुने व शुल्क याबाबतची माहिती प्रत्येक वितरण परवानाधारक त्याच्या इंटरनेटवरील संकेत-स्थळावर, आयोगाच्या पूर्व-परवानगीने, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांच्या आत किंवा परवाना मंजूर केल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत, जे लागू असेल त्याप्रमाणे, उतरवून घेण्याच्या स्वरुपात प्रसिध्द करेल.

## ४.२ ग्राहकाने करावयाचा अर्ज

४.२.१ जेथे वितरण परवानाधारकाच्या ग्राहकाने, जो विनियम ३.१ नुसार पात्र ठरत असेल, अशा वितरण परवानाधारका व्यतिरिक्त अन्य वीज निर्मिती कंपनी अथवा परवानाधारकाकडून वीज पुरवठा प्राप्त करुन घेण्यासाठी वितरण यंत्रणेमध्ये मुक्त प्रवेश मिळविण्याकरिता अर्ज केला असेल तर, विद्युत पुरवठा संहितेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार आणि काल-मर्यादेच्या आत, अशा ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित करण्यासाठी आणि वीज पुरवठ्याचा करार समाप्त करण्यासाठी ग्राहक आणि वितरण परवानाधारक योग्य कार्यवाही करतील;

परंतु असे की, जर एखाद्या ग्राहकाने 'डे अहेड' तत्त्वावर पॉवर एक्स्चेंजकडून करावयाच्या वीज खरेदीसाठी विजेचे वहन करण्याकरिता मुक्त प्रवेशासाठी अर्ज केला तर त्याला हा खंड लागू नसेल.

४.२.२ जेथे वितरण परवानाधारकाच्या ग्राहकाने, जो विनियम ३.१ नुसार पात्र ठरत असेल, अशा वितरण परवानाधारका व्यतिरिक्त अन्य वीज निर्मिती

कंपनी अथवा परवानाधारकाकडून वीज पुरवठा प्राप्त करुन घेण्यासाठी वितरण यंत्रणेमध्ये मुक्त प्रवेश मिळविण्याकरिता अर्ज केला असेल तर, वितरण परवानाधारक अशा ग्राहकाच्या करारांतर्गत मागणीत/मंजूर विद्युत भारात, अर्जामध्ये मागणी केलेल्या क्षमते इतकी कपात करेल. अशी कपात, करारांतर्गत मागणी/मंजूर भारात करावयाच्या कपाती संबंधात, वेळोवेळी सुधारित करण्यात आलेल्या विद्युत पुरवठा संहितेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार आणि कृतीच्या मानकांच्या विनियमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या काल-मर्यादेमध्ये, करण्यात येईल.

परंतु असे की, जर एखाद्या ग्राहकाने 'डे अहेड' तत्त्वावर पॉवर एक्स्चेंजकडून करावयाच्या वीज खरेदीसाठी विजेचे वहन करण्याकरिता मुक्त प्रवेशासाठी अर्ज केला तर त्याला हा खंड लागू नसेल.

४.२.३ जेथे मुक्त प्रवेशास द्यावयाच्या मंजुरीमुळे वितरण मेन्समध्ये वाढ करण्याची किंवा नवीन उप-केंद्र सुरु करण्याची गरज नसेल, तर अशा ग्राहकाकरिता वितरण यंत्रणेमधून विजेच्या वहनाकरिता वितरण परवानाधारक परवानगी, वरील विनियम ४.२.१ नुसार कराराची समाप्ती झाल्याच्या दिनांकापासून किंवा वरील विनियम ४.२.२ नुसार करारांतर्गत मागणी/मंजुर विद्युत भारात कपात केल्याच्या दिनांकापासून, जसे असेल तसे, देईल.

४.२.४ जर ग्राहकाने वरीलप्रमाणे विनियम ४.२.१ किंवा विनियम ४.२.२ अंतर्गत कोणत्याही वेळी अर्ज करण्यापूर्वी, करारांतर्गत मागणी/विद्युत भारात वाढ करण्यासाठी अर्ज केला असेल आणि असा अर्ज वितरण मेन्सचा विस्तार अथवा नवीन उप-केंद्र सुरु करण्याबाबतची कामे पूर्ण करण्यासाठी प्रलंबित असेल तर, वितरण परवानाधारक अशी कामे कृतीच्या मानकांबाबतच्या विनियमांमध्ये अंतर्भूत असलेल्या काल-मर्यादांमध्ये पूर्ण करेल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक, अशी कामे पूर्ण होईपर्यंत अर्जदाराला विद्यमान पातळीनुसार विजेचा पुरवठा चालू ठेवेल आणि त्यानंतर अर्जदाराला मुक्त प्रवेश देण्यात येईल;

परंतु आणखी असे की, आयोगाने आकारांच्या वसुलीसाठी विद्युत पुरवठा संहितेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तत्त्वानुसार, या विनियम ४.२.४ खाली नमूद केलेली कामे पूर्ण करण्यासाठी आकारांची वसुली अर्जदाराकडून करण्याचा वितरण परवानाधारकाला हक्क राहील.

४.२.५ वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीचा करार जेव्हा या विनियमांनुसार अंमलात येईल तेव्हापासून, वितरण परवानाधारकाच्या प्राधिकृत प्रतिनिधीकडून ग्राहकाच्या मीटरमधील अंतिम नोंदी घेण्यात येतील;

परंतु असे की, मीटरमधील अंतिम नोंदी, ज्या वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाकडून ग्राहकाने वीज पुरवठा प्राप्त करुन घेण्याचे ठरविले असेल, त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

**परंतु आणखी असे की, ग्राहक किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीला मीटरमधील अंतिम नोंदी घेण्याच्या वेळी उपस्थित राहण्याचा हक्क राहील.**

४.२.६ वितरण परवानाधारकाला, पुढील विनियम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तत्त्वांनुसार, या विनियम ४.२ अंतर्गत मुक्त प्रवेशाची मागणी करणाऱ्या ग्राहकाकडून विजेच्या वहनासाठीच्या आकारांवर अतिरिक्त अधिभार वसूल करण्याचा हक्क राहील.

४.२.७ विनियम ४.२ मध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, वितरण परवानाधारकाच्या पात्र ग्राहकाला मुक्त प्रवेश मंजूर करण्याची तरतूद, कराराच्या समाप्तीच्या किंवा करारांतर्गत मागणीत कपात करण्याच्या दिनांकापर्यंत वितरण परवानाधारकाला देय असणाऱ्या सर्व रकमांचा हिशोब पूर्ण करण्याच्या अधीन राहून असेल;

परंतु असे की, वितरण परवानाधारकाने अशा ग्राहकाकडून विजेसाठी वसूल करावयाच्या कोणत्याही आकाराबाबत किंवा विजेसाठीच्या आकारांशिवाय मागणी केलेल्या अन्य कोणत्याही रकमेबाबत वितरण परवानाधारक आणि पात्र ग्राहक यांच्यामध्ये कोणताही वाद उद्‌भवल्यास, अशा वादाचे निराकरण होई पर्यंत, अधिनियमाच्या कलम ५६ नुसार, ग्राहकाने वादाची रक्कम वितरण परवानाधारकाकडे अनामत म्हणून जमा केल्या नंतर, अशा ग्राहकाला मुक्त प्रवेशाची परवानगी देण्यात येईल;

**परंतू असे की, वादाचे निराकरण झाल्यानंतर वितरण परवानाधारक ग्राहकाने अनामत म्हणून ठेवलेल्या रकमेचा भाग परत करताना त्यावर, भारताच्या रिझर्व बँकेच्या बँक दरा इतक्या दराने व्याज अदा करेल.**

४.३ <u>वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात जागा असलेल्या व्यक्तीने वीज पुरवठ्याच्या मागणीसाठी केलेला अर्ज</u>

४.३.१ जेव्हा एखादी व्यक्ती, जिची जागा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्या क्षेत्रात असेल आणि जी विनियम ३.१ नुसार पात्र ठरत असेल, अशा व्यक्तीने अशा वितरण परवानाधारका व्यतिरिक्त अन्य वीज निर्मिती कंपनी अथवा परवानाधारकाकडून वीज पुरवठा प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज केला तर, वितरण परवानाधारक अशा व्यक्तीला वितरण यंत्रणेमधून विजेचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करेल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक, या विनियम ४.३ खाली मुक्त प्रवेशाकरीता आलेल्या अर्जांवर, विजेचा पुरवठा करण्यासाठी आलेल्या अर्जांप्रमाणेच कार्यवाही करेल आणि विद्युत पुरवठा संहितेमध्ये लागू असणाऱ्या तरतूदी आणि कृतीच्या मानंकाच्या विनियमामधील विनिर्दिष्ट करण्यात आलेली कालमर्यादा अशा अर्जांची छाननी करण्याकरता आणि वितरण यंत्रणेमध्ये प्रवेश देण्याकरता लागू असतील;

परंतू असे की, विनियम ३.२.१ नूसार पॉवर एक्स्चेंजमधून विजेचा पुरवठा घेयासाठी मुक्त प्रवेशाची मागणी करण्यात आली असल्यास, त्याबाबतीत देखील हा विनियम लागू राहील.

४.३.२ वितरण परवानाधारकाला, या विनियम ४.३ नुसार करण्यात आलेल्या कामांसाठीचे आकार, विद्युत पुरवठा संहितेमध्ये आकारांची वसुली करण्यासाठी आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तत्त्वांनुसार, वसूल करण्याचा हक्क असेल.

४.४ अर्जदारास मुक्त प्रवेश देण्यासाठी आवश्यक कामे करण्याकरीता अधिनियमानुसार किंवा प्रचलित असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यानुसार वितरण परवानाधारकाने मिळवावयाच्या सर्व मंजुऱ्या आणि वैधानिक परवानग्या मिळवून देण्यासाठी सर्व व्यवस्था मुक्त प्रवेशाचा अर्जदार करेल.

४.५ विजेची जोडणी देण्यासाठी आवश्यक असणारे विद्युत संयंत्र किंवा उपकरण अर्जदाराच्या जागेत बसविण्यासाठी सुयोग्य जागा किंवा खोली भाडेपट्ट्याच्या तत्त्वावर वितरण परवानाधारकाला उपलब्ध करुन देण्यास मुक्त प्रवेशाच्या अर्जदाराला वितरण परवानाधारक कळवू शकेल;

परंतू असे की, वरील प्रमाणे भाडे पट्टा हा ९९ वर्षांच्या कालावधीकरीता किंवा मुक्त प्रवेशाच्या कालावधीकरीता, जे कमी असेल तसे, परस्परांना

मान्य असणाऱ्या अटींवर आधारित असेल आणि भाडेपट्ट्यासाठी द्यावयाचे भाडे हे प्रतिवर्षी रु.१ या दराने देय राहील.

४.६ विनियम ४.६ मध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, जेथे अशा जागेची किंवा खोलीची व्यवस्था स्थानिक प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमांतर्गत किंवा राज्य शासनाच्या संबंधित प्राधिकरणाद्वारे करणे आवश्यक असेल तर, अशा भाडेपट्ट्याच्या अटी व शर्ती या अशा नियमांखाली किंवा सदर प्राधिकरणाद्वारे निश्चित करण्यात येतील.

४.७ जर एखादी व्यक्ती नादार किंवा दिवाळखोर म्हणून घोषित करण्यात आली असेल किंवा अशा व्यक्तीने वितरण परवानाधारकाची दोन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीची देयके, त्यासंबंधी कोणताही वाद नसताना, अर्ज करण्यापूर्वी अदा केली नसतील तर, अशी व्यक्ती मुक्त प्रवेशाकरीता पात्र राहणार नाही.

## भाग-बी विजेची जोडणीयता

## ५. जोडणीयता मंजूर करणे

५.१ या भागामधील तरतुदींनुसार जर निर्मिती केंद्र वितरण यंत्रणेशी यापूर्वी जोडलेले नसेल तर, ५ मेगावॉट पेक्षा कमी स्थापित क्षमता असलेले निर्मिती केंद्र वितरण यंत्रणेशी जोडणी मागण्याकरिता अर्ज करण्यासाठी पात्र असेल आणि या विनियमांतील तरतुदींनुसार जोडणीसाठी अर्ज करेल;

परंतु असे की, ५ मेगावॉट पेक्षा जास्त स्थापित क्षमता असलेल्या निर्मिती केंद्राला देखील वितरण यंत्रणेशी जोडणी, विनियम ५.५ नुसार तांत्रिक्दृष्ट्या शक्य असेल तर, देता येऊ शकेल.

५.२ वितरण यंत्रणेशी जोडणी हवी असणारी स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पांसह सर्व पात्र निर्मिती केंद्रे, वितरण परवानाधारकाने घालून द्यावयाच्या कार्यपध्दतीमध्ये विहित करण्यात आलेल्या नमुन्यामध्ये वीज जोडणीसाठी वितरण परवानाधारकाकडे अर्ज करतील.

५.३ अर्जासोबत विना-परताच्याची रुपये दोन लाखांची रक्कम भरण्यात येईल.

५.४ वीज जोडणीसाठीच्या अर्जामध्ये, निर्मिती केंद्राचे प्रस्तावित भौगोलिक ठिकाण, ग्रीडला पुरवठा करावयाच्या विजेचे मेगावॅटम्धील परिमाण आणि आयोगाकडून मान्यता द्यावयाच्या कार्यपध्दतीमध्ये संबंधित वितरण परवानाधारकाकडून मागण्यात येईल अशा अन्य तपशीलाचाही समावेश असेल.

५.५ वितरण परवानाधारक, अर्ज प्राप्त झाल्यानंतर, राज्य पारेषण कंपनीशी आवश्यतेनुसार विचार-विनिमय करुन आणि समन्वय साधून,अर्जाची छाननी करेल आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण (ग्रीडला जोडणीसाठीची तांत्रिक मानके) विनियम, २००७ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार आवशयक आंतर-जोडणी अभ्यास करेल.

५.६ वितरण परवानाधारक, विजेची जोडणी मंजूर करताना, ज्या उप-केंद्रात, पुलिंग केंद्रात किंवा स्वीचयार्डमध्ये जोडणी द्यावयची आहे त्याचे नांव विनिर्दिष्ट करेल.

५.७ वितरण परवानाधारक स्वीचयार्ड आणि वितरण परवानाधारकाच्या उप-केंद्रातील पुरवठ्याच्या ठिकाणपर्यंतची आंतर-जोडणी सुविधा, यासारखी डिझाइनची ढोबळ वैषिट्ये आणि ती पूर्ण करण्यासाठीची काल-मर्यादा निर्देशित करेल. या सुविधा उभारण्याचा खर्च निर्मिती कंपनी करेल. जर

वितरण परवानाधारकाच्या उप-केंद्राची वाढ करावी लागणार असेल तर बे, वितरण परवानाधारकाच्या उप-केंद्रातील ब्रेकर आणि राज्य भार प्रेषण केंद्राची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष माहितीची आंतर-जोडणी करण्याकरिता लागणा-या उपकरणांवरील खर्च देखील निर्मिती केंद्र सहन करेल.

परंतु असे की, निर्मिती कंपनीने निर्माण केलेल्या मत्तांची मालकी निर्मिती कंपनीकडे राहील.

५.८ केंद्रीय विद्युत प्राधिकरण (ग्रीडला जोडणीसाठीची तांत्रिक मानके) विनियम, २००७ मधील तरतुदींचे अर्जदार आणि वितरण परवानाधारक पालन करतील.

५.९ जेथे विजेची जोडणी देण्यात येत असेल तेथील वितरण परवानाधारकाशी अर्जदार वीज जोडणी करार करेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांच्या आत एक नमुना करार त्याच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करेल.

५.१० अर्जदाराला विजेची जोडणी मंजूर करण्यात आली तरी त्यामुळे या विनियमातील तरतुदींनुसार अर्जदार दीर्घ-कालीन, मध्यम-कालीन किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश प्राप्त करुन घेत नाही तोपर्यंत त्याला ग्रीडशी कोणत्याही विजेचा आंतर-बदल करण्याचा हक्क नसेल.

५.११ कोणत्याही प्रकारचा मुक्त प्रवेश मिळण्यापूर्वी, राज्य भार प्रेक्षण केंद्र आणि वितरण परवानाधारक यांच्याकडून परवानगी घेतल्यानंतर, जे अशी परवानगी देताना ग्रीडची सुरक्षितता विचारात घेतील, स्व-वापरासाठीच्या

निर्मिती प्रकल्पासह वीज निर्मिती केंद्राला वीज वाणिज्यिक वापरासाठी देण्यापूर्वी ग्रीडमध्ये अनिश्चित वीज पुरवून पूर्ण भार चाचणी करण्यासह चाचणीचे काम हाती घेण्यास परवानगी देण्यात येईल. अ-पारंपारिक ऊर्जा स्त्रोतावर आधारित असलेल्या निर्मिती केंद्रांशिवाय अन्य निर्मिती केंद्र किंवा त्याच्या युनिट पासूनच्या अनिश्चित विजेच्या चाचणीचे आकार आणि वीज दर यांचे नियमन वेळोवेळी अमलात असलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ करण्यात येईल. अशा चाचणीच्या परिणामस्वरुप अन्य निर्मिती केंद्रांकडून ग्रिडला पुरविण्यात आलेल्या विजेकरीता आकारणी, राज्यात प्रचलित असलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर (एबीटी) प्रणाली अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या यंत्रणा सर्वोच्च किंमतीने (सिस्टिम मार्जिनल प्राइसने) किंवा आयोगाने वितरण परवानाधारकाच्या, ज्याला निर्माता जोडलेला आहे, मागील वर्षाच्या किरकोळ वीज दराच्या आदेशात मान्यता दिलेल्या दीर्घ-कालीन वीज खरेदीच्या सरासरी खर्चा इतक्या किंमतीने, या दोन पैकी जे कमी असेल त्याप्रमाणे, करण्यात येईल.

परंतु असे की, अनिश्चित विजेचा पुरवठा करण्यापूर्वी, स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पासह निर्मिती केंद्र, वितरण परवानाधारकाबरोबर अनिश्चित विजेचा पुरवठा करण्यासाठी एक करार करतील. परंतु आणखी असे की, जर वीज निर्मात्याने कोणत्याही परवानाधारकाबरोबर विजेच्या विक्रीसाठी करार केलेला नसेल तर निर्मिती केंद्र ज्या वितरण परवानाधारकाबरोबर जोडण्यात आले आहे त्याच्यावर अनिश्चित विजेसाठी आकारणी करण्यात येईल.

५.१२ वितरण यंत्रणेला यापूर्वीच प्रचलित करारांतर्गत जोडलेल्या वीज निर्मात्याला किंवा ग्राहकाला, त्याच क्षमतेच्या जोडणीकरिता अर्ज करण्याची गरज नसेल. तथापि स्व-वापरासाठी निर्मिती प्रकल्पासह अन्य वीज निर्मात्याच्या क्षमतेत वाढ झाली तर किंवा स्व-वापरासाठीच्या उपयोगकर्त्यासह अन्य ग्राहकाच्या विजेच्या गरजेमध्ये वाढ झाली तर त्याला या विनियमाच्या तरतूदींना अनुसरुन जोडणीमध्ये फेरबदल करण्यासाठी नवीन अर्ज करावा लागेल.

## भाग-सी मुक्त प्रवेशासाठी सर्वसाधारण तरतूदी

## ६. करार

६.१ वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेला जोडणी देण्यासाठी आणि वापर करण्यासाठी एक वीज यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी करार –

(एक) असा वितरण परवानाधारक

(दोन) ग्राहक किंवा व्यक्ति ज्याची जागा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात असेल आणि ज्याला अशा वितरण परवानाधारका व्यतिरिक्त अन्य वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाकडून वीज पुरवठा हवा असेल; आणि

(तीन) वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक ज्याने अशा वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा विजेच्या वहनासाठी उपयोग करुन अशा ग्राहकाला किंवा व्यक्तीला विजेचा पुरवठा करण्याचे ठरविले आहे यांच्यामध्ये या विनियमाना अनुसरुन मुक्त प्रवेश देण्यात आल्यानंतर सोबतच्या जोडपत्र-२ मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यात करण्यात येईल.

परंतू असे की, विनियम ३.२.१ नुसार पॉवर एक्स्चेजकडून वीज पुरवठा मिळण्यासाठी केलेल्या मुक्त प्रवेशाच्या अर्जाला देखील हा विनियम लागू राहील.

परंतू असे की, या विनियमांनानुसार अशा ग्राहकाला/व्यक्तीला मुक्त प्रवेशाद्वारे विजेचा पुरवठा प्राप्त करुन घेणे शक्य व्हावे यासाठी, वितरण परवानाधारक, सदर वीज यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी कराराचा नमुना त्याच्या संकेतस्थळावर, उतरवून घेण्याच्या स्वरुपात, असा ग्राहक/व्यक्ती मुक्त प्रवेशासाठी पात्र झाल्याच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांच्या आत किंवा परवाना मंजूर करण्यात आल्यानंतर साठ (६०) दिवसांच्या आत, जे नंतर असेल त्याप्रमाणे, प्रसिद्ध करेल.

६.२ वितरण परवानाधारक पात्र ग्राहकाला /व्यक्तीला वीज यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी करारावर सही करण्यापूर्वी कमीत कमी दोन (२) दिवसांची नोटीस देईल ज्यात-

(अ) अशा ग्राहकाला/व्यक्तीला मुक्त प्रवेश मंजूर करण्याकरिता या विनियमांनुसार आणि अधिनियमातील सर्व आवश्यकता आणि सर्व कामे पूर्ण झाल्याबाबत;

(ब) लागू असल्यास, ग्राहकाच्या जागेतील मीटर मधील अंतिम नोंदी घेण्याचा दिनांक आणि वेळ; आणि

(क) लागू असल्यास, वीज पुरवठ्याचा करार समाप्त करण्याचा आणि वीज यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी करार सुरु करण्याचा दिनांक व वेळ;

कळविण्यात येईल.

६.३ ग्राहक किंवा व्यक्ती ज्याला विजेचा पुरवठा हवा असेल, ज्याची जागा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात असेल आणि ज्याला या विनियमांनुसार मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला असेल, वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाबरोबर, दोन्ही पक्षकारांना मान्य होतील अशा अटी व शर्तीवर (वीज दरासह), एक करार किंवा व्यवस्था करेल.

परंतू असे की, अशा अटी व शर्ती (वीज दरासह) ज्या पक्षकारांनामध्ये मान्य करण्यात येतील त्या अधिनियम आणि या विनियमांतील तरतूदींशी विसंगत नसतील.

## ७. जागेत व मालमत्तेमध्ये प्रवेश

७.१ अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियम आणि विनियमांखाली प्राधिकृत करण्यात आलेल्या वितरण परवानाधारकाच्या प्राधिकृत प्रतिनिधीं किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीला, कोणतेही विद्युत सयंत्र,विद्युत वाहिन्या किंवा मीटर चालवण्याचा, हाताळण्याचा किंवा काढून टाकण्याचा किंवा ग्राहकाच्या जागेतील वितरण परवानाधारकाच्या मालमत्तेवरील मोहर, नावाच्या पाट्या आणि ओळख क्रमांक किंवा खुणा तोडण्याचा, काढून टाकण्याचा किंवा खोडून टाकण्याचा किंवा अन्य प्रकारे त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसेल.

परंतु असे की, असा प्राधिकृत प्रतिनिधी वरील पैकी कोणतीही कामे कनेक्टर किंवा त्याच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीशिवाय करणार नाही;

परंतु आणखी असे की, कनेक्टरच्या जागेला प्राधिकृत प्रतिनिधीच्या भेटीची पूर्व सूचना वितरण परवानाधारक देईल. तथापि कोणतीही व्यक्ती विजेचा अनधिकृत वापर करीत असल्याबाबत आणि/किंवा अशा जागेत

अधिनियमाच्या भाग १४ मध्ये तरतूद केलेल्या स्वरुपाचा गुन्हा करीत असल्याबाबात, विश्वास ठेवण्यास कारण असल्यास, अशी पूर्व-सूचना दिली जाणार नाही.

७.२ जर विजेचा अनधिकृत वापर होत असल्याबाबत किंवा अधिनियमाच्या भाग १४ खाली गुन्हा होत असल्याबाबतच्या गृहितकावर जागेची तपासणी करण्यात येत असल्यास, अधिनियमाच्या कलम १२६ खाली राज्य सरकारने पदनिर्देशित केलेल्या किंवा अधिनियमाच्या कलम १३६ खाली राज्य सरकारने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने, जसे असेल तसे, जागेला दिलेल्या भेटीची नोंद वितरण परवानाधारकाने ठेवावयाच्या दैनिक रोजवहीमध्ये ठेवण्यात येईल ज्यामध्ये अशा अधिका-याचे नाव आणि कनेक्टरच्या जागेला द्यावयाच्या भेटीचा तपशील ठेवण्यात येईल.

परंतु असे की, जेथे शक्य असेल तेथे, अशा भेटीसाठी दोन स्वतंत्र साक्षीदार नेण्यात येतील आणि अशा अधिका-याने कनेक्टरच्या जागेला दिलेल्या भेटीतील निर्ष्कषाबाबतच्या तयार केलेल्या अहवालावर त्याच्या शे-यासह, असल्यास, अधिका-याने सही केलेली असेल आणि त्यावर कनेक्टर आणि/किंवा त्याच्या प्रतिनिधीने आणि अशा साक्षीदाराने सह्या केलेल्या असतील;

परंतु असेही की, कनेक्टर किंवा त्याच्या प्रतिनिधीने अहवालावर सही करण्यास नकार दिल्यास त्याची नोंद सदर अहवालात घेण्यात येईल;

परंतू असेही की, तपासणी अहवालाची एक प्रत कनेक्टरला देण्यात येईल.

## ८. मुक्त प्रवेशाची वर्गवारी

८.१ मुक्त प्रवेश ग्राहकांची वर्गवारी

पात्र ग्राहकांनी मुक्त प्रवेश मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाची कार्यपद्धत, अर्जसोबतचे शुल्क आणि विनंतीची छाननी करण्यासाठी कालमर्यादा, याबाबी खालील निकषांवर आधारित असतील-

८.१.१ विजेचा पुरवठा घेण्याचे आणि पुरवठा करण्याचे आप-आपसातील ठिकाणे -

(अ) दोन्ही ठिकाणे त्याच वितरण यंत्रणेत

(ब) राज्याच्या अंतर्गत परंतु दोन वेगवेगळ्या वितरण यंत्रणांमध्ये

(क) वेगवेगळ्या राज्यांमध्ये

८.१.२ मुक्त प्रवेशाचा कालावधी

(अ) <u>दीर्घ-कालीन प्रवेश</u>

ज्या व्यक्तींनी १२ वर्षापेक्षा जास्त परंतु २५ वर्षांपेक्षा कमी कालावधींकरीता वितरण यंत्रणेमध्ये प्रवेश घेतला आहे किंवा घेण्याचा उद्देश आहे अशा व्यक्ती दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ते म्हणून मानण्यात येतील;

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे विद्यमान दीर्घ-कालीन लाभधारक हे त्या विशिष्ट यंत्रणेचे मानीव दीर्घ-कालीन उपयोगकर्ते असतील;

(ब) <u>मध्यम-कालीन मुक्त प्रवेश</u>

ज्या व्यक्तीने ३ महिन्यांपेक्षा जास्त परंतू ३ वर्षांपेक्षा कमी कालावधींकरीता वितरण यंत्रणेमध्ये प्रवेश घेतला आहे किंवा घेण्याचा उद्देश आहे अशा व्यक्तीला मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ते म्हणून संबोधण्यात येईल;

(क) <u>अल्प-कालीन मुक्त प्रवेश</u>

ज्या व्यक्तींनी वितरण यंत्रणेमध्ये ३० दिवसांपेक्षा जास्त नसलेल्या कालावधींसाठी मुक्त प्रवेश घेतला आहे किंवा घेण्याचा उद्देश आहे अशा व्यक्तींना अल्प-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ते म्हणून संबोधण्यात येईल.

परंतु असे की, अल्प-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ते हे त्यांची मुदत संपल्यानंतर मुक्त प्रवेश प्राप्त करुन घेण्यासाठी पात्र किंवा फेर-पात्र राहतील.

## ९. मुक्त प्रवेशासाठी अर्ज करण्याची कार्यपद्धती

९.१ या विनियमानुसार, मुक्त प्रवेशासाठी सर्व अर्ज विहित करण्यात आलेल्या नमुन्यात आणि नोडल एजन्सीला सादर करण्यात येतील.

९.२ नोडल एजन्सी, अर्जाचे शुल्क, अर्जासोबत पाठवावयाची कागदपत्रे आणि अर्ज निकाली काढण्यासाठी काल-मर्यादा, या बाबी खालील तक्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील : -

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आप-आपसातील वीज पुरवठा घेण्याचे आणि करण्याचे ठिकाण** | **नोडल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** | **अर्ज निकाली काढण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या-पासूनच्या दिवसात)** |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आप-आपसातील वीज पुरवठा घेण्याचे आणि करण्याचे ठिकाण** | **नोडल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** | **अर्ज निकाली काढण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या-पासूनच्या दिवसात)** |
| १. | अल्प-कालीन मुक्त प्रवेश | दोन्ही त्याच वितरण परवानाधारकाच्या अंतर्गत | संबंधित वितरण परवाना--धारक | २,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, निश्चित ऊर्जा कराराचा पुरावा, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास त्याच्या शेवटच्या ग्राहक देयकाची प्रत | • अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज असल्यास दहा (१०) कामाच्या दिवसात<br>• त्यानंतरचा अ.का.मु.प्र अर्ज पाच (५) कामाच्या दिवसात |
| २. | | दोन्ही राज्याच्या अंतर्गत परंतू वेगवेगळ्या वितरण परवानाधारकांच्या क्षेत्रात | ग्राहक ज्याच्याशी जोडला आहे असा वितरण परवाना-धारक | ५,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, निश्चित ऊर्जा कराराचा पुरावा, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास त्याच्या शेवटच्या ग्राहक देयकाची प्रत | • अ.कामु. .प्र साठी पहिला अर्ज असल्यास दहा (१०) कामाच्या दिवसात<br>• त्यानंतरचा अ.का.मु.प्र अर्ज पाच (५) कामाच्या दिवसात |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आप-आपसातील वीज पुरवठा घेण्याचे आणि करण्याचे ठिकाण** | **नोडल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** | **अर्ज निकाली काढण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या-पासूनच्या दिवसात)** |
| ३. | | राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये वीज पुरवठा करण्याचे ठिकाण राज्याच्या अंतर्गत | ग्राहक ज्याच्याशी जोडला आहे असा वितरण परवाना--धारक | ५,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, निश्चित ऊर्जा कराराचा पुरावा, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास त्याच्या शेवटच्या ग्राहक देयकाची प्रत | • अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज असल्यास दहा (१०) कामाच्या दिवसात<br>• त्यानंतरचा अ.का.मु.प्र अर्ज पाच (५) कामाच्या दिवसात |
| ४. | | वेगवेगळ्या राज्यांमध्ये | ज्या प्रदेशात ग्राहक स्थित असेल तेथील प्रादेशिक भार प्रेक्षण केंद्र | ५,००० | संबधित राज्य भार प्रेषण केंद्रे आणि वितरण परवानाधारकांकडून लागू असल्याप्रमाणे संमती, अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, निश्चित ऊर्जा कराराचा पुरावा, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास त्याच्या शेवटच्या ग्राहक देयकाची प्रत | केंद्रीय आयोगाच्या विनियमाप्रमाणे |
| ५. | | ग्राहकाने पॉवर एक्स्चेंजकडून वीज पुरवठा घेण्याचा पर्याय | ग्राहक ज्याच्याशी जोडला आहे असा | ५,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास त्याच्या | • अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आप-आपसातील वीज पुरवठा घेण्याचे आणि करण्याचे ठिकाण** | **नोडल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** | **अर्ज निकाली काढण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या-पासूनच्या दिवसात)** |
| | | स्वीकारल्यास | वितरण परवाना-धारक | | शेवटच्या ग्राहक देयकाची प्रत | असल्यास दहा (१०) कामाच्या दिवसात<br>● त्यानंतरचा अ.का.मु.प्र अर्ज पाच (५) कामाच्या दिवसात |
| ६. | मध्यम-कालीन मुक्त प्रवेश | दोन्ही त्याच वितरण परवानाधारकाच्या अंतर्गत | ग्राहक ज्याच्याशी जोडला आहे असा संबंधित वितरण परवाना-धारक | ५०,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेले नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा | तीस (३०) |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आप-आपसातील वीज पुरवठा घेण्याचे आणि करण्याचे ठिकाण** | **नोडल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** | **अर्ज निकाली काढण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या-पासूनच्या दिवसात)** |
| ७. | | दोन्ही त्याच राज्याच्या अंतर्गत परंतू वेगवेगळ्या वितरण परवानेधारकाच्या क्षेत्रात | ग्राहक ज्याच्याशी जोडला आहे असा संबंधित वितरण परवाना-धारक | १,००,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेले नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा, दुस-या वितरण परवानाधारकाची संमती | साठ (६०) |
| ८. | | राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये वीज पुरवठा करण्याचे ठिकाण राज्याच्या अंतर्गत | ग्राहक ज्याच्याशी जोडला आहे असा संबंधित वितरण परवाना-धारक | १,००,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेले नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा | साठ(६०) |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आप-आपसातील वीज पुरवठा घेण्याचे आणि करण्याचे ठिकाण** | **नोडल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** | **अर्ज निकाली काढण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या-पासूनच्या दिवसात)** |
| ९. | | वेगवेगळ्या राज्यांमध्ये | केंद्रीय पारेषण कंपनी | १,००,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेले नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा, संबधित राज्य भार प्रेषण केंद्रे आणि वितरण परवानाधारकांकडून लागू असल्याप्रमाणे संमती | केंद्रीय आयोगाच्या विनियमाप्रमाणे |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | कालावधी | आप-आपसातील वीज पुरवठा घेण्याचे आणि करण्याचे ठिकाण | नोडल एजन्सी | अर्जाचे शुल्क (रुपये) | अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे | अर्ज निकाली काढण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या-पासूनच्या दिवसात) |
| १० | | दोन्ही त्याच वितरण परवानाधारकाच्या अंतर्गत | संबंधित वितरण परवाना धारक | ५०,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेले नसेल तर, दी.का.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा | तीस (३०) |
| ११ | दीर्घ-कालीन प्रवेश | दोन्ही राज्याच्या अंतर्गत परंतू वेगवेगळ्या वितरण परवानेधारकाच्या क्षेत्रात | ग्राहक ज्याच्याशी जोडला आहे असा संबंधित वितरण परवाना-धारक | १,००,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा,वीज खरेदी करार किंवा विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेले नसेल तर, दी.का.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा, संबंधित वितरण परवानाधारकाची संमती | • पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसल्यास एकशे वीस (१२०) दिवस<br>• पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असल्यास एकशे ऐंशी (१८०) दिवस |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आप-आपसातील वीज पुरवठा घेण्याचे आणि करण्याचे ठिकाण** | **नोडल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** | **अर्ज निकाली काढण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या-पासूनच्या दिवसात)** |
| १२ | | राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये वीज पुरवठा करण्याचे ठिकाण राज्याच्या अंतर्गत | ग्राहक ज्याच्याशी जोडला आहे असा संबंधित वितरण परवाना-धारक | १,००,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेले नसेल तर, दी.का.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा, संबंधित वितरण परवानाधारकाची संमती | • पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसल्यास एकशे वीस (१२०) दिवस<br>• पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असल्यास एकशे ऐंशी (१८०) दिवस |
| १३ | | वेगवेगळ्या राज्यांमध्ये | केंद्रीय पारेषण कंपनी | १,००,००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेची विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेले नसेल तर, दी.का.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा, संबंधित राज्य भार प्रेषण केंद्रे आणि वितरण परवानाधारकांकडून | केंद्रीय आयोगाच्या विनियमाप्रमाणे |

| वितरण यंत्रणेला जोडलेले ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **कालावधी** | **आप-आपसातील वीज पुरवठा घेण्याचे आणि करण्याचे ठिकाण** | **नोडल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** | **अर्ज निकाली काढण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या-पासूनच्या दिवसात)** |
| | | | | | लागू असल्याप्रमाणे संमती | |
| | | | | | | |

## १०. दीर्घ-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धती

### १०.१ आंतर-राज्य पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यास

खालील विनियम १०.२ मध्ये पुढे काहीही नमूद केले असले तरी, आंतर-राज्य दीर्घ-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धती ही वेळोवेळी अमलात असलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणी मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९ प्रमाणे असेल;

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी जोडलेल्या ग्राहकाला आंतर-राज्य दीर्घ-कालीन प्रवेश हवा असेल तर राज्य भार प्रेक्षण केंद्र, त्यांची संमती केंद्रीय आयोगाच्या विनियमामध्ये आवश्यक असल्याप्रमाणे प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला कळविण्यापूर्वी, ग्राहकाला संबंधित वितरण परवानाधारकाची संमती सादर करण्यास कळवेल.

१०.२ <u>त्याच वितरण यंत्रणेच्या अंतर्गत</u>

येथे वर नमूद केलेल्या विनियम १०.१ मधील तरतूदीना अधीन राहून, वीज पुरवठा करण्याचे ठिकाण आणि वीज पुरवठा घेण्याचे ठिकाण त्याच

वितरण यंत्रणेमध्ये असतील तेव्हा दीर्घ-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धती ही येथे पुढील उप-खंड (ए ते एल ) मधील तरतूदींना अनुसरुन असेल -

(ए) दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर करण्यासाठीच्या अर्जात जेथून वीज प्राप्त करुन घ्यावयाची असेल अशा कंपनीचे नाव किंवा कंपन्यांची नावे, प्राप्त करुन घ्यावयाच्या विजेचे मेगावॉट मधील परिमाण आणि वितरण परवानाधारकाने सविस्तर कार्यपद्धतीमध्ये नमूद केलेला इतर तपशील, यांचा समावेश असेल. दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशासाठी करावयाचा नमुना अर्ज जोडपत्र-४ मध्ये देण्यात आला आहे.

जेथे मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठी वितरण यंत्रणेत वाढ करण्याची आवश्यकता असेल आणि ज्या व्यक्तीला विजेचा पुरवठा करावयाचा आहे त्या व्यक्तीला पुरवठा करावयाच्या विजेचे परिमाण किंवा कोणत्या स्त्रोतातून वीज पुरवठा करावयाचा आहे, ते निश्चित करण्यात आलेले नसेल तर, वितरण यंत्रणेचा वापर करुन विजेचे जितके परिमाण आंतरबदल करावयाचे ठरविले असेल, ते अर्जदार निर्देशित करेल;

परंतु आणखी असे की, वितरण यंत्रणेत वाढ करण्याची आवश्यकता असल्यास, त्यासाठी येणारा खर्च, जरी विजेचा पुरवठा करण्याचे स्त्रोत किंवा खरेदी निश्चित करण्यात आली नसले तरी, या विनियमानुसार अर्जदाराला करावा लागेल;

परंतु असेही की, अशी वाढ करणे सुलभ व्हावे यासाठी, वीज पुरवठ्याचा अचूक स्त्रोत किंवा वीज खरेदीचे ठिकाण, जसे असेल तसे, निश्चित करावे लागेल आणि त्यानुसार ते वितरण

परवानाधारक एजन्सीला, दीर्घ-कालीन प्रवेश प्राप्त करुन घेण्याच्या उद्देशित दिनांकाच्या कमीत कमी तीन वर्षे आधी किंवा वितरण परवानाधारकाने वितरण यंत्रणेच्या वाढीकरिता अंदाजित केलेला कालावधी, यापैकी जो कमी असेल त्यानुसार, कळविणे आवश्यक आहे;

परंतु आणखी असे की, अर्जदाराच्या ठिकाणात कोणताही महत्वाचा बदल झाला असल्यास किंवा वितरण यंत्रणेचा वापर करुन आंतरबदल करावयाच्या विजेच्या परिमाणात १० टक्यापेक्षा जास्त बदल झाला असल्यास, एक नवीन अर्ज करण्यात येईल आणि सदर अर्जाचा विचार या विनियमांनुसार करण्यात येईल.

(बी) सर्व बाजूंनी विचार करुन वितरण यंत्रणेचे नियोजन करणे वितरण परवानाधारकाला शक्य व्हावे यासाठी, वितरण यंत्रणेचा वापर करुन आंतरबदल करावयाच्या विजेचे निर्धारण करण्यासाठीचा आधार आणि विविध विद्युत कंपन्या किंवा प्रदेशांकडे किंवा त्यांच्यापासून पारेषण करावयाची वीज या बाबींसह वितरण परवानाधारक मागेल ती अन्य कोणतीही माहिती अर्जदार सादर करेल;

(सी) पारेषित करावयाच्या एकूण विजेच्या प्रति मेगावॅट रुपये १०,००० (दहा हजार) प्रमाणे बँक हमी अर्जासोबत जोडण्यात येईल. सदर बँक हमी ही वितरण परवानाधारकाच्या नावे असेल आणि ती सविस्तर कार्यपद्धतीमध्ये घालून देण्यात आलेल्या रितीनुसार असेल.

(डी) जर वितरण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची गरज असेल तर, सदर प्रति मेगावॅट रुपये १०,००० (दहा हजार) ची बँक हमी ही दीर्घ-कालीन प्रवेश करार कार्यान्वित होईपर्यंत आणि जर वितरण यंत्रणेमध्ये वाढ

करण्याची गरज नसेल तर, दीर्घ-कालीन प्रवेशाची अंमलबजावणी होईपर्यंत, वैध ठेवण्यात येईल.

(इ) अर्जदाराने जर अर्ज मागे घेतला तर किंवा वितरण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसेल तेव्हा दीर्घ-कालीन प्रवेशाच्या हक्कांची अंमलबजावणी होण्यापूर्वी, हे हक्क सोडून देण्यात आले तर वितरण परवानाधारकाकडून बँक हमीचे रोखीकरण करण्यात येईल.

(एफ) जेव्हा वितरण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असेल तेव्हा बांधकाम चालू असताना, अर्जदाराकडून वितरण परवानाधारकाला बँक हमी द्यावयाची गरज असल्यास, सविस्तर कार्यपद्धतीमधील तरतूदींनुसार, बँक हमी सादर केल्यावर बँक हमी देण्याची पूर्तता झाली असल्याचे मान्यात येईल.

(जी) वितरण परवानाधारक, अर्ज प्राप्त झाल्यानंतर, वितरण यंत्रणेचा वापर करु शकणाऱ्या अन्य संस्थांशी विचार-विनिमय करुन आणि त्यांच्याशी समन्वय साधून, अर्जाची छाननी करेल आणि येथे वरील विनियम ९.२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या काल-मर्यादेत दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात येईल याची खात्री करण्यासाठी आवश्यक यंत्रणा अभ्यास शक्य तितक्या त्वरेने पूर्ण करेल;

परंतू असे की, वितरण परवानाधारकाला विचार-विनिमयाच्या किंवा समन्वयाच्या प्रक्रियेमध्ये कोणतीही अडचण आली तर तो आयोगाकडे योग्य निर्देश मागू शकेल.

(एच) वरील अभ्यासाच्या आधारे, दीर्घ-कालीन प्रवेश देण्यासाठी कोणती वितरण यंत्रणा लागेल ते वितरण परवानाधारक विनिर्दिष्ट करेल.

जर विद्यमान वितरण यंत्रणेमध्ये वाढ करावयाची गरज असेल तर अर्जदाराला तसे कळविण्यात येईल.

(आय) वितरण परवानाधारक, दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर करताना, ज्या दिनांकापासून दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर करण्यात येईल तो दिनांक आणि तसेच आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या विद्यमान खर्चाच्या, किंमतीच्या आणि पारेषण आकारांच्या विभागणीच्या पद्धतीच्या आधारे देय होणारे अंदाजित वहन आकार, अर्जदाराला कळवेल.

(जे) वितरण परवानाधारकाने जर दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश मंजूर केला तर, सविस्तर पद्धतीमध्ये करण्यात येतील अशा तरतूदींनुसार, अर्जदार दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशासाठी वितरण परवानाधारकाबरोबर वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी करार करेल. दीर्घ-कालीन प्रवेशासाठीच्या करारात दीर्घ-कालीन प्रवेशाला सुरुवात झाल्याचा दिनांक, ग्रीडमध्ये विजेचा पुरवठा करण्याचे ठिकाण आणि ग्रीडमधून विजेचा पुरवठा घेण्याचे ठिकाण आणि सर्मपित वितरण वाहिन्यांचा, गरज असल्यास, तपशील समाविष्ट असेल. वितरण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची गरज असल्यास, दीर्घ-कालीन प्रवेश करारामध्ये, अर्जदार आणि वितरण परवानाधारकांच्या सुविधांच्या बांधकामासाठी काल-मर्यादा, अर्जदाराने द्यावयाची बँकेची हमी आणि सविस्तर कार्यपद्धतीनुसार अन्य तपशील, यांचा समावेश असेल.

(के) दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर केल्यानंतर वितरण परवानाधारक, राज्य भार प्रेषण केंद्राला तसे ताबडतोब कळवेल ज्यामुळे केंद्राला याचा

विचार, या कराराखाली विजेचे शेड्यूलींग करण्यासाठी आलेल्या मागण्यांची छाननी करताना, करणे शक्य होईल.

(एल) दीर्घ-कालीन प्रवेशाची मुदत संपल्यानंतर, ग्राहकाने मुदत संपण्याच्या किमान सहा महिने आधी वितरण परवानाधारकाला लेखी विनंती करुन त्यात किती कालावधीसाठी वाढ करुन हवी असेल ते नमूद केल्यास त्याप्रमाणे मुदत वाढ देण्यात येईल;

परंतु असे की, वर विनिर्दिष्ट केलेल्या काल-मर्यादेत ग्राहकाकडून कोणतीही विनंती न आल्यास, सदर दीर्घ-कालीन प्रवेश, तो सुरुवातीला ज्या दिनांकापर्यंत मंजूर करण्यात आला असेल त्या दिनांकास समाप्त होईल.

## ११ मध्यम-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धती

११.१ खालील विनियम ११.२ मध्ये पुढे काहीही नमूद केले असले तरी, आंतर-राज्य दीर्घ-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धती ही वेळोवेळी अमलात असलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणी मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९ प्रमाणे असेल;

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी जोडलेल्या ग्राहकाला आंतर-राज्य दीर्घ-कालीन प्रवेश हवा असेल तर राज्य भार प्रेक्षण केंद्र, त्यांची संमती केंद्रीय आयोगाच्या विनियमांमध्ये आवश्यक असल्याप्रमाणे प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला कळविण्यापूर्वी, ग्राहकाला संबंधित वितरण परवानाधारकाची संमती सादर करण्यास कळवेल.

११.२ <u>त्याच वितरण यंत्रणेच्या अंतर्गत</u>

येथे वर नमूद केलेल्या विनियम ११.१ मधील तरतूदीना अधीन राहून, जेव्हा वीज पुरवठा करण्याचे ठिकाण आणि वीज पुरवठा घेण्याचे ठिकाण त्याच वितरण यंत्रणे अंतर्गत असतील तर मध्यम-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धती ही येथे पुढील उप-खंड (ए ते एफ) मधील तरतूदींना अनुसरुन असेल -

(ए) मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठीच्या अर्जात, सविस्तर कार्यपद्धतीमध्ये नमूद करण्यात येईल तो तपशील आणि, विशेष करुन, ग्रीडमध्ये विजेचा पुरवठा करण्याचे ठिकाण, ग्रीडमधून विजेचा पुरवठा घेण्याचे ठिकाण, विजेच्या जितक्या परिमाणाकरिता मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मागण्यात आला आहे ते विजेचे परिमाण. यांचा समावेश असेल. मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी करावयाचा नमुना अर्ज जोडपत्र-४ मध्ये देण्यात आला आहे.

(बी) मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाला सुरुवात झाल्याचा दिनांक हा ज्या महिन्यात अर्ज करण्यात आला असेल त्या महिन्याच्या शेवटच्या दिवसापासून ५ महिने आधीचा आणि १ वर्षानंतरचा नसेल.

उदाहरणार्थ, १ जानेवारीपासून सुरु होणा-या मुक्त प्रवेशासाठीचा अर्ज मागील वर्षातील जुलै महिन्याच्या ३१ तारखेपर्यंत घेण्यात येईल. त्याचप्रमाणे, मुक्त प्रवेश मंजूरीसाठीचा अर्ज मागील वर्षातील जुलै महिन्याच्या ३१ तारखेला सादर करण्यात आला असल्यास तो पुढील वर्षाच्या १ ऑगस्टपासून सुरु होणा-या कालावधीकरिता नसेल.

(सी) वितरण परवानाधारक, अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अर्जाची छाननी करेल आणि येथे वरील विनियम ९.२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या

काल-मर्यादेत मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात येईल याची खात्री करण्यासाठी आवश्यक यंत्रणा अभ्यास शक्य तितक्या त्वरेने पूर्ण करेल;

परंतू असे की, वितरण परवानाधारकाला विचार-विनिमयाच्या किंवा समन्वयाच्या प्रक्रियेमध्ये कोणतीही अडचण आली तर तो आयोगाकडे योग्य निर्देश मागू शकेल.

(डी) विनियम ९.२ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या गरजांची पूर्तता झाली आहे याची खात्री झाल्यानंतर, वितरण परवानाधारक अर्जात मागणी केलेल्या कालावधीकरीता मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करेल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक अर्जामध्ये मागीतलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीकरीता मध्यम-कालीन मुक्त प्रवेश, त्यासंबंधीची कामे लेखी नोंद करुन, मंजूर करेल.

परंतु आणखी असे की, अर्जदार, वितरण परवानाधारकांबरोबर, सविस्तर कार्यपद्धतीमध्ये करण्यात येतील अशा तरतूदींना अनुसरुन, वितरण यंत्रणेशी जोडणी व वापरकरण्यासाठीच्या करारावर सही करेल. वितरण यंत्रणेशी जोडणी व वापरकरण्यासाठीच्या करारात, मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाची सुरुवात व समाप्तीचा दिनांक, ग्रीडमध्ये वितरण पुरवठा करण्याचे ठिकाण आणि ग्रीडमधून वितरण पुरवठा घेण्याचे ठिकाण, वितरण जाळ्याचा तपशील, अर्जदाराने द्यावयाची बँक हमी आणि सविस्तर कार्यपद्धतीत नमूद केलेला अन्य तपशील असेल.

(इ) मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मंजूर केल्यानंतर वितरण परवानाधारक, राज्य भार प्रेषण केंद्राला तसे ताबडतोब कळवेल ज्यामुळे केंद्राला याचा विचार, या विनियमाखाली आलेल्या काल व परिमाण निर्धारणासाठी आलेल्या मागण्यांची छाननी करताना, करणे शक्य होईल.

(एफ) मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, मुदतीचे नवीकरण करण्यासाठी मध्यम-कालीन ग्राहकाला सर्वाधिक प्राधान्य मिळण्याचा हक्क नसेल.

## १२ अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धती

१२.१ आंतर राज्य पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यास

खालील विनियम १२.२ मध्ये पुढे काहीही नमूद केले असले तरी, आंतर-राज्य दीर्घ-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धती ही वेळोवेळी अमलात असलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणी मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९ प्रमाणे असेल;

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी जोडलेल्या ग्राहकाला आंतर-राज्य अल्प-कालीन प्रवेश हवा असेल तर राज्य भार प्रेषण केंद्र, त्यांची संमती केंद्रीय आयोगाच्या विनियमांमध्ये आवश्यक असल्याप्रमाणे प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला कळविण्यापूर्वी, ग्राहकाला संबंधित वितरण परवानाधारकाची संमती सादर करण्यास कळवेल. परंतु आणखी असे की, ग्राहकाकडून कोणत्याही वाद नसलेल्या रक्कमा येणे नसल्यास, वितरण परवानाधारक त्याची संमती देईल.

१२.२ त्याच वितरण यंत्रणेच्या अंतर्गत.

येथे खाली विनिर्दिष्ट केलेली कार्य पद्धती अल्प-कालीन मुक्त प्रवेशाला, जर वीज पुरवठा करण्याचे ठिकाण आणि वीज पुरवठा घेण्याचे ठिकाण त्याच वितरण यंत्रणेमध्ये असेल तर, लागू राहिल.

**१२.२.१ आगाऊ मुक्त-प्रवेश**

(एक) वितरण परवानाधारकाकडे अल्प-कालीन मुक्त प्रवेश दुसऱ्या महिन्या पर्यंत मिळण्यासाठी अर्ज सादर करता येईल; असे करताना ज्या महिन्यात अर्ज करण्यात येत असेल तो महिना पहिला महिना म्हणून विचारात घेण्यात येईल.

(दोन) प्रत्येक महिन्यासाठी आणि महिन्यातील प्रत्येक व्यवहारासाठी वेगळा अर्ज करण्यात येईल.

(तीन) वितरण परवानाधारकाकडे जोडपत्र-३ (नमुना अल्प-कालीन-१)मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करण्यात येईल. या नमुन्यात खालील तपशील म्हणजेच आवश्यक असलेली क्षमता, नियोजित वीज निर्मिती किंवा करार बद्ध केलेली विजेची खरेदी, वीज पुरवठा करण्याचे ठिकाण, वीज पुरवठा घेण्याचे ठिकाण, घेत असलेल्या मुक्त-प्रवेशाचा कालावधी, सर्वोच्च विद्युत भार, सरासरी विद्युत भार आणि वितरण परवानाधारकाला आवश्यक वाटणाऱ्या अन्य अतिरिक्त माहितीचा समावेश असेल. अर्जासोबत ना-परताव्याचे अर्जासाठीचे शुल्क रोखीने किंवा वितरण परवानाधारकाने अधिसुचित केलेल्या अधिकाऱ्याच्या नावे काढलेल्या डिमांड ड्राफ्टने पाठविण्यात येईल.

(चार) मुक्त प्रवेश मंजुरीसाठीचा अर्ज ''अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी आगाऊ अर्ज'' असे पाकिटावर लिहून मागील महिन्याच्या १०व्या दिवसापर्यंत कोणत्याही महिन्यात सादर करता येईल.

उदा., जुलै महिन्यात सुरु होणाऱ्या मुक्त प्रवेशासाठीचा अर्ज जुन महिन्याच्या दहाव्या दिवसापर्यंत स्वीकारण्यात येईल.

(पाच) वितरण परवानाधारक अर्जदाराला ''पोच-पावती'' देताना त्यावर अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक आणि वेळ नमुद करेल.

(सहा) अल्प-कालीन मुक्त प्रवेश कोणत्या प्रकारचा मागण्यात आला आहे ते विचारात घेऊन, वितरण परवानाधारक अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जावर, खालील नमुद केलेल्या पद्धतीने निर्णय घेईल.

(सात) वरील उप-उप-खंड सात खाली प्राप्त झालेले सर्व अर्ज एकत्रीतपणे विचारात घेण्यात येतील आणि त्यांच्यावर या विनियमांच्या विनियम-१५ खाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वाटप प्राधान्य निकषांप्रमाणे प्रक्रिया करण्यात येईल.

(आठ) वितरण परवानाधारक वितरण जाळ्यात मागणी करण्यात आलेल्या मुक्त प्रवेश अर्जांची संख्या विचारात घेऊन सदर व्यवहाराची छाननी करेल.

(नऊ) वितरण परवानाधारक मुक्त प्रवेश मंजुर झाला असल्यास तसे किंवा अन्यथा, जोडपत्र-३ (नमूना-अल्प-कालीन-२) प्रमाणे ग्राहकाला रक्कमा भरण्याच्या वेळापत्रकांसह उशीरात उशीरा अशा मागील महिन्याच्या १९व्या दिवसांपर्यंत कळवेल.

(दहा) उप-उप-खंड (नऊ) खाली मुक्त प्रवेश नाकारण्यात आला असल्यास त्याची विशिष्ट कारणे वितरण परवानाधारक देईल.

### १२.२.२ डे-अहेड मुक्त प्रवेश

वितरण परवानाधारकाच्या यंत्रणेमध्ये, पूर्णतः किंवा अंशतः क्षमता स्पष्टपणे परत करण्यात आली असेल किंवा जी मागील तीन दिवसात वापरण्यात आली नसेल, अशी शिल्लक क्षमता उपलब्ध असल्यास, डे-अहेड व्यवहारांना परवानगी देण्यात येईल;

(एक) डे-अहेड मुक्त प्रवेश मंजुर करण्यासाठीचाअर्ज डे-अहेड व्यवहाराच्या निर्धारित दिनांकाच्या दोन(२) दिवसआधी परंतु निर्धारित दिवसाच्या आधीच्या दिवशी दुपारी १ वाजण्यापूर्वी वितरण परवानाधारक स्वीकारेल.

उदा., जुलै महिन्याच्या २५व्या दिवशीच्या डे-अहेड व्यवहारासाठी अर्ज त्या महिन्याच्या २३व्या किंवा २४व्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येईल.

(दोन) वरील विनियम १२.२ अ च्या उप-उप-खंड ९ मधील तरतूदीप्रमाणे, वितरण परवानाधारक यंत्रणेवरील अपेक्षित भाराचा तपास करेल व नंतर त्याच जोडपत्र-३ (नमूना अल्प-कालीन-२) च्या नमून्यामधील मंजूरी दिली असल्यास तसे अथवा अन्यथा कळवेल. अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जाबाबतच्या अन्य सर्व तरतूदी लागू राहतील.

### १२.२.३ बोलीसाठीची कार्यपद्धती

(एक) ग्राहकाने पुढील महिन्या करिता आगाऊ मुक्त प्रवेशासाठी मागणी केलेली क्षमता, जर उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त असेल किंवा राज्य भार प्रेषण केंद्राला संबंधित व्यवहाराकरिता पारेषण किंवा वितरण यंत्रणेच्या कोणत्याही भागावर जास्त मागणीचा भार येत असल्याचे

वाटले तर, क्षमतेचे वाटप इलेक्ट्रॉनिक बोली कार्यपद्धती द्वारे करण्यात येईल;

(दोन) यंत्रणेवरील अपेक्षित भारासंबंधी राज्य भार प्रेषण केंद्राने घेतलेला निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.

(तीन) राज्य भार प्रेषण केंद्र जोडपत्र-३ मधील तरतूदीनुसार, भाराबाबतची माहिती आणि किमान किंमतीचा निर्देश करुन बोली प्रकियेसाठी आमंत्रण पाठविण्याचा निर्णय अर्जदाराला जोडपत्र-३ (नमूना अल्प-कालीन-३) मधील नमून्यात कळवेल;

(चार) राज्य भार प्रेषण केंद्र बिलींग प्रक्रिये संबंधिची माहिती त्यांच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करेल.

(पाच) आयोगाच्या संबंधित आदेशाच्या आधारे निश्चित केलेली व्यवहाराची किमान किंमत आणि वहन आकार जोडपत्र-३ (नमूना अल्प-कालीन-३) मध्ये निर्देशित करण्यात येईल.

(सहा) जोडपत्र -३ मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यामधील बोली, जोडपत्र-३ (नमूना अल्प-कालीन-३) मधील बोलीसाठीच्या आमंत्रणात निर्देशित केलेल्या ''बोली बंद व्हावयाच्या वेळेपर्यंत'' स्वीकारण्यात येईल. बोली सादर केल्यानंतर, त्यात फेरबदल/सुधारणा स्वीकारण्यात येणार नाहीत.

(सात) एखाद्या ग्राहकाने जर बोली प्रक्रियेत भाग घेतला नाही तर त्याचा अर्ज मागे घेण्यात आला आहे असे मानण्यात येईल व त्याची छाननी केली जाणार नाही.

(आठ) राज्य भार प्रेषण केंद्राकडून बोली सादर करण्यासाठीची वेळ/दिनांक वाढवून देण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

(नऊ) ज्या परिमाणात (डिनॉमिनेशन) किमान किंमत निश्चित करण्यात आली असेल त्याच परिमाणात, बोलीदार त्यांची किंमत (पूर्णांकात) नमूद करेल.

(दहा) नमूद करण्यात आलेली किंमत उतरत्या क्रमाने मांडण्यात येईल आणि उपलब्ध क्षमतेचे वाटप, उपलब्ध क्षमता संपेपर्यंत, अशा उतरत्या क्रमाने करण्यात येईल.

(अकरा)दोन किंवा अधिक ग्राहकांनी एकच किंमत नमूद केली असल्यास, उप-उप-खंड (दहा) खाली कोणत्याही टप्प्यावर उरलेल्या उपलब्ध क्षमतेचे वाटप अशा ग्राहकांनी मागितलेल्या क्षमतेच्या प्रमाणात करण्यात येईल.

(बारा) ज्या ग्राहकांना पूर्ण क्षमतेचे वाटप करण्यात आले आहे ते, बोलीमध्ये मिळालेली उच्चतम किंमत अदा करतील.

(तेरा) ज्या ग्राहकांना कमी क्षमतेचे वाटप करण्यात आले आहे ते, बोलीमध्ये त्यांनी नमूद केलेली किंमत अदा करतील.

(चौदा)ज्या बोली कोणत्याही प्रकारे अपूर्ण, अस्पष्ट किंवा बोलीच्या कार्यपधतीस अनुसरुन नसल्याचे आढळून येतील त्या बोली राज्य भार प्रेषण केंद्राकडून नाकारण्यात येतील.

(पंधरा) यशस्वी बोलीदार, ज्याला क्षमतांचे वाटप करण्यात आले आहे, या खंडाच्या उप-उप खंड  (बारा) किंवा (तेरा) खाली बोली प्रक्रियेतून निश्चित करण्यात आलेले पारेषण आकार, वहान आकार, जसे असेल तसे, अदा करेल.

१२.२.४‘अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाकडून राखीव क्षमतांचे हस्तांतरण इतरांन  करता येणार नाही.

१२.२.५ राज्य भार प्रेषण केंद्राकडून राखीव क्षमता परत, कपात किंवा रद्द करण्यात आल्यामूळे उपलब्ध झालेली क्षमता, या विनियमांना अनुसरुन अन्य कोणत्याही अल्प-मुदत मुक्त प्रवेश ग्राहकाकरिता राखीव ठेवता येऊ शकेल.

परंतु असे की, कोणत्याही ग्राहकाने क्षमता परत, कपात किंवा रद्द केल्यामुळे, जर सदर वितरण वाहिनीवर सातत्याने भार नसल्यास, राज्य भार प्रेषण केंद्र सद्य परिस्थिती वितरण परवानाधारकाला कळवेल. राज्य भार प्रेषण केंद्र भार-रहित परिस्थिती कलल्यानंतर, वितरण परवानाधारक, वरील विनियम १२ अंतर्गत, सदर वितरण वाहिनी मुक्त प्रवेशासाठी देईल.

१२.२.६ अल्प-कालीन मुक्त प्रवेशाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, मुदतीचे नवीकरण करण्यासाठी अल्प-कालीन ग्राहकाला सर्वाधिक प्राधान्य मिळण्याचा हक्क नसेल.

## १३ वितरण परवानाधारकाची संमती

१३.१ <u>आंतर-राज्य मुक्त प्रवेशः</u>

वितरण परवानाधारकाच्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेमध्ये दीर्घ-कालीन प्रवेश, मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी आलेल्या अर्जाच्या संदर्भात, वितरण परवानाधारक त्याची संमती अथवा अन्यथा राज्य पारेषण कंपनी आणि/किंवा राज्य भार पारेषण केंद्राला अनुक्रमे वेळोवेळी अमलात असलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणी मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९ आणि

केंद्रीय विद्युत नियामक आयोग (आंतर-राज्य पारेषणामध्ये प्रवेश) विनियम, २००८ प्रमाणे, कळवेल. अर्जदार वितरण यंत्रणेला जोडलेला असल्यास, सदर वितरण परवानाधारक त्याची संमती अथवा अन्यथा अर्जदाराची विनंती प्राप्त झाल्यापासून तीन दिवसात कळवेल.

१३.२ <u>राज्यांतर्गत मुक्त प्रवेश</u>

(अ) निर्मिती केंद्राकडून मुक्त प्रवेशासाठी आलेल्या अर्जाची छाननी करताना, वितरण परवानाधारक खालील बाबींची पडताळणी करेल-

(एक) अंमलात असलेल्या राज्य ग्रीड संहितेमधील तरतूदींनुसार वेळ-गट-निहाय ऊर्जेचे मीटरींग करण्यासाठी आणि हिशोब ठेवण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उपलब्धता;

(दोन) वितरण जाळ्यामध्ये क्षमतेची उपलब्धता.

(ब) आवश्यक पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि क्षमतेची उपलब्धता वितरण जाळ्यमध्ये असल्याचे सिद्ध झाल्यावर, वितरण परवानाधारक त्याची संमती अर्जदाराला, अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच (५) कामाच्या दिवसांत ई-मेल अथवा फॅक्स द्वारे अथवा अन्य कोणत्याही मान्यता देण्यात आलेल्या संपर्क साधनांनी अर्जदाराला कळवेल.

(क) वितरण परवानाधारक, संमतीसाठी आलेला अर्ज कोणत्याही बाबतीत अपूर्ण अथवा सदोष असल्याचे आढळून आल्यास, उणीव अथवा दोष अर्जदाराला अर्ज प्राप्त झाल्यापासून तीन (३) कामाच्या दिवसांत ई-मेल अथवा फॅक्सद्वारे किंवा संदेश वहनाच्या मान्यताप्राप्त नेहमीच्या अन्य कोणत्याही मार्गाने, अर्जदाराला कळवेल.

(ड) अर्ज योग्य असल्याचे आढळून आल्यावर, आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा नसल्याच्या कारणास्तव किंवा वितरण जाळ्यामध्ये शिल्लक क्षमता उपलब्ध नसल्यामुळे, वितरण परवानाधारकाने संमती देण्याचे नाकारले तर असा नकार, त्याबाबतच्या कारणांसह, अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच (५) कामाच्या दिवसांत ई-मेल अथवा फॅक्सद्वारे किंवा मान्यताप्राप्त नेहमीच्या अन्य कोणत्याही मार्गाने, अर्जदाराला कळवेल.

१३.३ <u>पॉवर एक्स्चेंज मधून वीज पुरवठा घेणारा ग्राहक</u>

ग्राहकाकडून वाद नसलेली कोणतीही रक्कम येणे बाकी नसल्यास, वितरण परवानाधारक त्याची संमती ताबडतोब देईल.

## १४ थकबाकीदारांकडून आलेल्या अर्जांचा विचार

या विनियमांमध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, वितरण परवानाधारकाला, मुक्त प्रवेशासाठी आलेला अर्ज, या विनियमांतील तरतुदींचे विशेषकरुन त्यात देण्यात आलेल्या आकार वेळेवर अदा करण्याच्या तरतुदीचे, पालन न करण्याच्या कारणात्सव, अशा कारणाची लेखी नोंद ठेवून, नाकारण्याचे स्वातंत्र्य राहील.

परंतु असे की, अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणताही अर्ज नाकारण्यात येणार नाही.

## १५ वाटपासाठी प्राधान्य

१५.१ वितरण यंत्रणेमध्ये मुक्त प्रवेश वाटपास खालील निकषांनुसार प्राधान्य देण्यात येईल :

(अ) मुक्त प्रवेशासाठी आलेला अर्ज दीर्घ-कालीन, मध्यम-कालीन अथवा अल्प-कालीन प्रवेशासाठी असला तरी वितरण परवानाधारकाला मुक्त प्रवेश क्षमतेचे वाटप करण्यास उच्चत्तम प्राधान्य राहील.

(ब) वितरण परवानाधारकांनंतर दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील.

(क) दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारानंतर मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील.

(ड) मध्यम-कालीन प्रवेशाच्या अर्जदारांनंतर अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील.

(इ) अल्प-कालीन मुक्त प्रवेश अर्जदारांना क्षमतेच्या उपलब्धतेस अधीन राहून वाटपासाठी प्राधान्य राहील.

(फ) विद्यमान मुक्त प्रवेश ग्राहकाला नवीन मुक्त प्रवेश ग्राहकापेक्षा संबंधित वर्गवारीखाली उच्च प्राधान्य राहील. पंरतु त्यासाठी विद्यमान ग्राहकाने त्याच्या प्रचलित मुक्त प्रवेशाची मुदत संपण्यापूर्वी तीस दिवस आधी त्याच्या नवीकरणासाठी अर्ज दाखल केला असला पाहिजे.

(ग) जर अर्जदाराची संभाव्य गरज उपलब्ध क्षमतेपक्षा जास्त असेल आणि असा ग्राहक त्याची गरज उपलब्ध क्षमते इतकी कमी करु शकत नसेल तर, त्याच्यापेक्षा कमी प्राधान्य असलेल्या अर्जदाराची विनंती विचारात घेण्यात येईल.

**भाग-डी - मुक्त प्रवेशासाठी आकार**

## १६ देयक तयार करणे

१६.१ पुरवठादाराकडून ग्राहकाला विजेच्या पुरवठ्यासाठी देयक पाठवण्यात येईल आणि अशा देयकामध्ये खालील बाबी स्पष्टपणे व वेगळ्या दाखवण्यात येतील :

(एक) वीज पुरवठा करारामधील अटी व शर्तींनुसार वीज पुरवठ्यासाठी आकार

(दोन) पारेषण आकार

(तीन) वहन आकार

(चार) अधिनियम किंवा या विनियमांखाली किंवा वेळोवेळी अमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याखाली ग्राहकाकडून वसूली-योग्य असलेला कोणताही अन्य आकार अथवा अन्य रक्कम.

१६.२ वितरण यंत्रणेचा विजेच्या वहनासाठी केलेल्या वापराकरीता वितरण परवानाधारकाकडून पुरवठादाराला किंवा मुक्त प्रवेश ग्राहकाला देयक पाठविण्यात येईल आणि त्यामध्ये खालील बाबी स्पष्टपणे व वेगळ्या दाखविण्यात येतील :

(एक) वरील विनियम १६.१ नुसार ग्राहकांकडून वसूल केलेले अथवा वसूल करावयाचे वहन आकार;

(दोन) खालील विनियम १८ नुसार ग्राहकांकडून वसूल केलेला किंवा वसूल करावयाचा क्रॉस सबसिडी अधिभार;

(तीन) खालील विनियम १९ नुसार ग्राहकांकडून वसूल केलेला अथवा वसूल करावयाचा वहन आकारावरील अतिरिक्त अधिभार; आणि

(चार) अधिनियम किंवा या विनियमांखाली किंवा वेळोवेळी अमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याखाली ग्राहकाकडून वसूली-योग्य असलेला कोणताही अन्य आकार अथवा अन्य रक्कम.

परंतु असे की, विनियम १६.१ खाली ग्राहकाला पाठविण्यात आलेल्या देयकाची रक्कम ग्राहकाने अदा न करण्याच्या कारणात्सव पुरवठादार, विनियम १६.२ खाली पाठविण्यात आलेल्या देयकाची रक्कम वितरण परवानाधारकाला अदा करण्याचे थांबवू शकणार नाही.

१६.३ या विनियम १६ खाली देयक दर महिन्यास पाठविण्यात येईल.

१६.४ या विनियम १६ खाली पाठविण्यात आलेल्या देयकांची रक्कम विद्युत पुरवठा संहितेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत भरण्यात येईल.

## १७ वहन आकार

वितरण यंत्रणेचा वापर करणारे मुक्त प्रवेश ग्राहक खालीलप्रमाणे वहन आकार अदा करतील :

१७.१ मुक्त प्रवेश ग्राहकाने वितरण परवानाधारकाला त्याच्या यंत्रणेचा वापर करण्यासाठी द्यावयाचे वहन आकार वेळोवेळी अमलात असलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ खली निश्चित करण्यात येतील.

परंतु असे की, वहन आकार हे विजेच्या प्रत्यक्ष प्रवाहाच्या आधारे, दिवसाच्या भागाच्या आकारासह देय राहतील;

परंतु आणखी असे की, जेथे फक्त मुक्त प्रवेश ग्राहकाच्या वापराकरीता मुक्त प्रवेशासाठी सर्मपित वितरण यंत्रणा उभारण्यात आली असेल तर, अशा सर्मपित वितरण यंत्रणेसाठीचे वहन आकार वितरण परवानाधाकाकडून त्याच्या संबंधित यंत्रणांकरीता काढण्यात येतील व त्यास आयोगाची मान्यता घेण्यात येईल. हे वहन आकार पूर्णपणे अशा

मुक्त प्रवेश ग्राहकाला, जो पर्यंत त्याच्या शिल्लक क्षमतेचे वाटप आणि वापर अन्य व्यक्तींना किंवा अन्य कारणासाठी करण्यात येत नाही तोपर्यंत, भरावे लागतील.

## १८ क्रॉस सबसिडी अधिभार

१८.१ या विनियमांनुसार मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आलेल्या ग्राहक आणि व्यक्तीला विजेचा पुरवठा हवा असेल तर त्याला, विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे क्रॉस सबसिडी अधिभार, मुक्त प्रवेश मिळण्यासाठी एक अट म्हणून, अदा करावा लागेल;

परंतु असे की, असा क्रॉस सबसिडी अधिभार हा वीज दर वर्गवारी/ वीज दर टप्पा आणि / किंवा व्होल्टेजच्या पातळीवर, जिला असा ग्राहक किंवा व्यक्ति जोडलेली असेल, सध्याच्या पातळीवरील असलेल्या क्रॉस सबसिडीवर आधरित असेल आणि तो, जर अशा वीज दर वर्गवारी/ वीज दर टप्पा आणि / किंवा व्होल्टेजच्या सध्याच्या पातळीवर जर कोणतीही क्रॉस सबसिडी नसेल तर, लागू करण्यात येणार नाही.

**परंतु असे की, विनियम १६.२ नुसार पुरवठादाराला आकारांचे देयक देण्याचा व त्याच्याकडून वसूल करण्याचा वितरण परवानाधारकाला हक्क राहील.**

परंतु आणखी असे की, तुटवड्याच्या काळात आणि वितरण परवानाधारकाने भार नियमन केले असल्यास आयोग कमी अधिभार निश्चित करु शकेल.

परंतु आणखी असे की, व्यक्तीने स्व-वापरासाठीच्या विजेच्या निर्मितीकरिता जर स्व-वापरासाठीचा निर्मिती प्रकल्प उभा केला असेल व त्याला जर

मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला असेल, तर त्याच्यावर स्व-वापराच्या ठिकाणी वीज नेण्याकरिता अधिभार लावण्यात येणार नाही.

१८.२ मुक्त प्रवेश ग्राहकाने मुक्त प्रवेशाच्या माध्यमातन संबंधित महिन्यात जितकी ऊर्जा प्रत्यक्षात घेतली असेल त्याच्या आधारे प्रति युनिट क्रॉस सबसिडी अधिभार निश्चित करण्यात येईल व तो दर महिन्यास देय राहील. अधिभाराची रक्कम मुक्त प्रवेश मागण्यापूर्वी ज्या वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातून ग्राहकाला विजेचा पुरवठा मिळत होता त्याला अदा करण्यात येईल.

१८.३ मुक्त प्रवेश ग्राहकाने वितरण परवानाधारकाला त्याच्या यंत्रणेच्या वापराकरिता द्यावयाची क्रॉस सबसिडी वेळोवेळी अमलात असलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती ) विनियम, २००५ खाली निश्चित करण्यात येईल.

१८.४ आयोगाने निशित केलेला क्रॉस सबसिडी अधिभार दर वर्षी १० टक्क्यांनी लायनर दराने कमी करण्यात येईल,

म्हणजेच, पहिल्या वर्षासाठी निश्चित करण्यात आलेला रुपया १ प्रति युनिट क्रॉस सबसिडी अधिभार दुस-या वर्षी प्रति युनिट ९० पैसे व तिस-या वर्षी ८० पैसे प्रति युनिट, या प्रमाणात पुढे निश्चित करण्यात येईल.

परंतु असे की, वीज पुरवठ्याच्या स्थितीमध्ये किंवा ग्राहकांच्या मुक्त प्रवेश मागणीच्या भारात महत्त्वाचा बदल झाल्यास, आयोग, आवश्यक असेल तेव्हा, क्रॉस सबसिडी अधिभाराचा आढावा घेईल.

परंतु असे की, जेव्हा क्रॉस सबसिडी कमी करण्याचे वेळापत्रक अधिसूचित करण्यात येईल तेव्हा विनियम १८.४ मध्ये प्रस्तावित केलेला १० टक्के लायनर कपातीचा दर आयोगाकडून पुनः ठरवून देण्यात येईल.

१८.५ अधिनियमाच्या कलम ६२ च्या उप-कलम (१) च्या खडं (डी) मधील तरतुदींनुसार वीज दर निश्चितीकरणाच्या अर्जासोबत वितरण परवानाधारक त्याच्या पुरव्ठ्याच्या क्षेत्रांतर्गत क्रॉस सबसिडीच्या सध्याच्या पातळीच्या परिगणनेचा पूर्ण तपशील आयोगाला सादर करेल.

परंतु असे की, अशा परिगणनेच्या संबंधित आयोगाला उपलब्ध करुन दिलेल्या दस्तऐवज आणि कागदपत्रांच्या प्रती कोणत्याही व्यक्तीला वितरण परवानाधारक देईल आणि/किंवा अशी परिगणना वितरण परवानाधारकाच्या संकेत-स्थाळावर, त्याबाबत अभिप्राय/सूचना, आयोगाला व वितरण परवानाधारकाला कळविण्यासाठी प्रदर्शित करेल.

१८.६ आयोग, वितरण परवानाधारकाने सादर केलेल्या परिगणनेची योग्य छाननी करुन-

(अ) वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रांतर्गत क्रॉस सबसिडीच्या सध्याच्या पातळीच्या परिगणनेला मान्यता देईल, किंवा

(ब) आयोगाने यापूर्वी मान्यता दिलेल्या पध्दतीनुसार जर अशी परिगणना केलेली नसेल किंवा ती अधिनियम व त्याखाली करण्यात आलेल्या नियम व विनियमातील तरतुदींना अनुसरुन नसेल तर, त्यासंबंधीची कारणे लेखी नमूद करुन, ती नाकारेल आणि एक तर वितरण परवानाधारकाला त्याने केलेली परिगणना पुनः सादर करण्याचे निर्देश देईल किंवा अशा वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रांतर्गत क्रॉस

सबसिडीची सध्याची पातळी म्हणून त्याला योग्य वाटेल अशी रक्कम ठरवून देईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारकाने केलेली परिगणना आयोगाने नाकारण्यापूर्वी त्याला त्याची बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल.

परंतु असे की, आयोगाने पुढील वर्षामध्ये अशा रितीने निश्चित केलेला सुधारित क्रॉस सबसिडी अधिभार फक्त नवीन मुक्त प्रवेश अर्जदारांना लागू राहील.

१८.७ वितरण परवानाधारकाने जर या विनियमांनुसार क्रॉस सबसिडीच्या सध्याच्या पातळीची परिगणना केली नाही व असे न करण्याची पुरेशी कारणे तो देऊ शकला नाही तर, आयोग, अशा वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रांतर्गत क्रॉस सबसिडीची सध्याची पातळी म्हणून त्याला योग्य वाटेल अशी रक्कम ठरवून देऊ शकेल.

१८.८ आयोग, मान्यता देण्यात आलेल्या क्रॉस सबसिडीच्या सध्याच्या पातळीच्या आधारे, वितरण परवानाधारकाच्या मान्यताप्राप्त वीज दराची प्रत्येक वर्गवारी आणि/किंवा उप-वर्गवारी आणि/किंवा वीज दराच्या टप्प्याकरिता क्रॉस सबसिडी अधिभार ठरवून देईल.

१८.९ अशा रितीने वसूल करण्यात आलेल्या अधिभाराच्या रकमेचा विनियोग वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रांतर्गत क्रॉस सबसिडीच्या सध्याच्या पातळीच्या गरजा भागविण्यासाठी करण्यात येईल.

## १९. अतिरिक्त अधिभार

१९.१ अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप-कलम (४) मधील बंधनानुसार वितरण परवानाधारकाला कराव्या लागणा-या विजेच्या पुरवठ्याकरिता होणारा स्थिर खर्च भागविण्याकरिता, वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील मुक्त प्रवेश ग्राहकाला, जो त्याच्या वितरण परवानाधारकाशिवाय अन्य व्यक्तीकडून विजेचा पुरवठा घेत आहे, विजेच्या वहनाकरिता वहन आकार आणि क्रॉस सबसिडी अधिभाराशिवाय, वहन आकारांवर अतिरिक्त अधिभार वितरण परवानाधारकाला अदा करेल,

१९.२ हा अतिरिक्त अधिभार, वीज खरेदीच्या बांधिलकीमुळे परवानाधारकाचे उत्तरदायित्व बाधित झाले असेल व बाधित होत राहणार असेल फक्त तरच किंवा त्याच्यावर अशा करारामुळे स्थिर आकार सोसण्याचे अनिवार्य उत्तरदायित्त्व असल्यास, लागू होईल. तथापि, विद्युत जाळ्याच्या मत्तांशी संबंधित स्थिर आकार वहन आकारातून वसूल करण्यात येतील.

१९.३ वितरण परवानाधारक विजेचा पुरवठा करण्याच्या त्याच्यावरील बंधनामुळे करीत असलेल्या स्थिर खर्चाची परिगणना केलेले एक सविस्तर विवरणपत्र आयोगास दर सहा महिन्यांनी सादर करेल.

१९.४ वितरण परवानाधारक, खालील तत्त्वांच्या आधारे, अतिरिक्त अधिभाराची परिगणना करेल -

(एक) वितरण परवानाधारकाने, अशा ग्राहकामुळे, असा खर्च केलेला असणे किंवा तो केला जाण्याची वाजवी शक्यता असणे आवश्यक आहे; आणि

(ब) सदर खर्च, आयोगाने अधिनियमाच्या कलम ६४ खालील अधिकारांचा वापर करुन मान्यता दिलेल्या वहन आकार, स्टॅन्ड-बाय आकार किंवा अशा अन्य आकारांतून, ग्राहकाकडून अथवा ज्यांना त्याच मत्तांमधून किंवा सुविधांमधून विजेचा पुरवठा करण्यात आला आहे अशा अन्य ग्राहकांकडून किंवा अन्य ठेकेदारांकडून वसूल केलेला किंवा करता येण्यासारखा नसेल.

आयोग, वितरण परवानाधारकाने वरील विनियम १९.३ अंतर्गत सादर केलेल्या स्थिर खर्चाच्या परिगणनेच्या वितरणपत्रकाची छाननी करेल आणि,असल्यास, हरकती मागवेल व अतिरिक्त अधिभाराची रक्कम निश्चित करेल.

परंतु असे की, आयोगाने असा निश्चित केलेला अतिरिक्त अधिभार, ज्या ग्राहकांना ते ज्या वितरण परवानाधारकाशी जोडलेले आहेत त्याच्याऐवजी वीज पुरवठा अन्य स्त्रोताकडून घेण्यासाठी मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे अशा सर्व ग्राहकांना, लागू राहील.

१९.५ मुक्त प्रवेश ग्राहकांनी संबंधित महिन्यात मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून घेतलेल्या प्रत्यक्ष ऊर्जेच्या आधारे प्रति युनिट निश्चित करण्यात आलेला अतिरिक्त अधिभार मासिक तत्त्वावर देय राहील.

परंतु असे की, ज्या व्यक्तीने त्याच्या स्वतःच्या वापराच्या ठिकाणी वीज नेण्यासाठी स्व-वापरासाठीचा निर्मिती प्रकल्प उभारला असेल अशा व्यक्तीला वितरण प्रवेश देण्यात आला असल्यास त्याच्यावर अतिरिक्त अधिभार लावण्यात येणार नाही.

## २०. वितरण परवानाधारकाकडून मुक्त प्रवेश ग्राहकाने वीज घेण्यासाठी स्टॅंड-बाय आकार

२०.१ वीज पुरवठादाराकडून विजेचा पुरवठा अकल्पितपणे खंडित अथवा समाप्त करण्यात आल्यास, मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून येणा-या भाराची मागणी भागविण्यासाठी वितरण परवानाधारक स्टॅन्ड-बाय विजेचा पुरवठा, विनियम २१.४ मध्ये तरतूद करण्यात आलेली अशी सुरक्षा अनामत संपेपर्यंत किंवा पुरवठ्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात येईपर्यंत, जे आधी घडेल तोपर्यंत, करेल.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहकाच्या डे-अहेड विनंतीनुसार असा स्टॅन्ड-बाय पुरवठा वितरण परवानाधारकाकडून चालू ठेवण्यात येईल.

मुक्त प्रवेश ग्राहकाला अशा वीज पुरवठ्यासाठी अनिर्धारित विनिमय (यु आय) आकार किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पध्दतीखाली निश्चित करण्यात आलेली एस एम पी किंवा वीज दराच्या अनुसूचीमध्ये देण्यात आलेल्या तात्पुरत्या वीज दरानुसार, जो जास्त असेल त्याप्रमाणे, आकार भरावे लागतील.

परंतु असे की, वीज दराच्या अनुसूचीमध्ये अशा वर्गवारीकरिता असलेल्या वीज दराच्या दुप्पट मागणी आकार अशा स्टॅन्ड-बाय पुरवठ्याच्या काळातील वीज पुरवठ्यासाठी असतील आणि ते वितरण परवानाधारकाकडून विद्युत पुरवठा संहितेमधील तरतुदींनुसार वसूल करण्यात येतील.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहकांना अन्य कोणत्याही स्रोताकडून स्टॅन्ड-बाय विजेची व्यवस्था करण्याचा पर्याय असेल.

## २१. सुरक्षा अनामत

२१.१ कनेक्टरने विजेची खरेदी करण्याचे ठरविल्यास ते वगळून अन्य प्रकरणी, वितरण परवानाधारक कनेक्टरला मीटरच्या किंमतीकरिता, अधिनियमाच्या कलम ४७ च्या उप-कलम (१) च्या खंड-(बी) मधील तरतूदींनुसार सुरक्षा अनामत ठेवण्यास कळवेल.

परंतु असे की, कोणत्याही प्रकरणी मीटरच्या सुरक्षा अनामतीची रक्कम मीटरच्या किंमतीपेक्षा जास्त असणार नाही.

२१.२ वितरण परवानाधारक पुरवठादाराला एक महिन्याच्या देयकातील वहन आकार, क्रॉस सबसिडी अधिभार आणि वहन आकारांवरील अतिरिक्त अधिभार, ज्यांची परिगणना वीज यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारातील अटी व शर्तीनुसार करण्यात आलेली असेल, इतकी सुरक्षा अनामत ठेवण्यास कळवेल.

२१.३ जेथे पुरवठादारांने विनियम, २१.२ अंतर्गत सुरक्षा अनामत वीज यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या कराराच्या सुरवातीला ठेवावयाची असेल तर, अशा सुरक्षा अनामतीची परिगणना विनियम, २१.२ खाली विजेच्या वहनाकरीता वितरण यंत्रणेच्या अंदाजित वापरवाच्या आधारे करण्यात येईल;

परंतु असे की, आवश्यक असलेली अतिरिक्त सुरक्षा अनामतीची रक्कम किंवा अतिरिक्त सुरक्षा अनामत जर वितरण परवानाधारकाकडे असलेल्या शिल्लक सुरक्षा अनामतीच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त असेल तेव्हा, सुरक्षा अनामतीच्या रकमेचे समायोजन करण्यात येईल.

२१.४ वितरण परवानाधारकाला, वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेतून पुरवठादाराकरीता एक महिन्यात विजेच्या वहनासाठी केलेल्या वीज

पुरवठ्यावरील खर्चाइतकी सुरक्षा अनामत ठेवण्यास पुरवठादाराला सांगण्याचा हक्क असेल.

परंतु असे की, पुरवठादाराने दिवाळखोरीपणा, नादारीच्या किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव अकल्पितपणे वीज पुरवठा खंडित किंवा समाप्त केल्यास, वितरण परवानाधारकाला अशा पुरवठादाराच्या ग्राहकांना वीज पुरवठा करणे शक्य व्हावे म्हणून अशी सुरक्षा अनामत ठेवण्यात येईल;

परंतु असे की, पुरवठादाराने वीज पुरवठा अकल्पितपणे खंडित अथवा समाप्त केल्यास, सुरक्षा अनामतीची रक्कम जोपर्यंत संपत नाही तोपर्यंत किंवा वीज पुरवठ्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात येत नाही तोपर्यंत, या पैकी जे आधी घडेल तोपर्यंत, वितरण परवानाधारक अशा पुरवठ्यादाराच्या ग्राहकांना विजेचा पुरवठा चालू ठेवण्याची व्यवस्था करेल.

स्पष्टीकरण - विनियम २१.४ च्या प्रयोजनासाठी, 'वीज पुरवठ्याचा खर्च' म्हणजे वितरण परवानाधारकाचा विजेचा पुरवठा करण्यासाठीचा खर्च, जो आयोगाने मंजूर केलेला असेल, जणु काही पुरवठादाराचे असे ग्राहक हे वितरण परवानाधारकाचे ग्राहक असतील.

२१.५ विनियम २१ खाली द्यावयाची सुरक्षा अनामत, अशी सुरक्षा अनामत देणारी व्यक्ती रोखीने धनादेश किंआ दर्शनी धनाकर्षासह (चेक आणि डिमांड-ड्राफ्ट), परत न घेता येणारे पत-पत्र (लेटर ऑफ क्रेडिट) किंवा अनुसूचित वाणिज्यिक बँकेने दिलेली विनाशर्त बॅक हमी, यापैकी कोणत्याही प्रकारे देवू शकेल.

परंतु असे की, सुरक्षा अनामत जर रोख स्वरुपात असेल तर, त्यावर भारतीय रिझर्व बँकेच्या बँक दरा इतक्या दराने व्याज देण्यात येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारककाकडून नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सुरक्षा अनामत ठेवण्यात येईल.

## २२. आकारणीची तत्त्वे

२२.१ आयोगाने वीज दराच्या विनियमानुसार विजेच्या वहनाकरिता निश्चित केलेले आकार पुरवठादार अदा करेल;

परंतु आणखी असे की, पुरवठ्यादाराने अदा करावयाच्या वहन आकारांमध्ये आयोग विनिर्दिष्ट करेल असे घटक जसे, व्होल्टेज, अंतर, दिशा आणि विद्युत प्रवाहाचे परिमाण आणि वापराची वेळ, विचारात घेण्यात येतील.

## २३. राज्य ग्रिड संहितेचे पालन

२३.१ विनिर्दिष्ट करण्यात येणाऱ्या राज्य ग्रिड संहितेचे पालन, ती ज्या मर्यादेपर्यंत लागू करण्यात आली असेल त्या मर्यादेपर्यंत करणे, सर्व कनेक्टरांचे आणि सर्व ठेकेदारांचे कर्तव्य असेल;

परंतु असे की, कनेक्टर आणि/ किंवा पुरवठादाराने राज्य ग्रिड संहितेचे पालन न केल्यास अशा कनेक्टर आणि/ किंवा पुरवठादाराला, जसे असेल तसे, अधिनियमाचा भंग केल्याचे परिणाम भोगावे लागतील;

परंतु आणखी असे की, कनेक्टर आणि/ किंवा पुरवठादाराने राज्य ग्रिड संहितेचे पालन न केल्यास अशा उपयोगकर्त्याबरोबर देखील केलेला वीज यंत्रणेशी जोडणी व वीज वापर करण्यासाठीचा करार रद्द केला जाऊ शकेल.

२३.२ या विनियमांना अनुसरुन मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, त्यांना लागू करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत संतुलन व हिशोबपूर्ती संहितेचे (Balancing and Settlement Code) पालन करेल.

परंतु असे की, अशा प्रत्येक व्यक्तीला संतुलन व हिशोबपूर्तीच्या संहितेमध्ये उल्लेख केलेले आकार, पारेषण यंत्रणेचा अनिर्धारित वापर करण्याकरिता आणि विजेच्या अनिर्धारित विनिमयाकरिता असलेल्या आकारांसह, अदा करावे लागतील.

**भाग- इ काल व परिमाण निर्धारण, मीटर मोजणी, सुधारणा आणि हानी**

**२४. काल व परिमाण निर्धारण**

२४.१ या विनियमाच्या पुढील खंडांमध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, आंतर-राज्य मुक्त प्रवेश व्यवहारांचे काल व परिमाण निर्धारण केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

२४.२ पुढील खंडांना अधीन राहून, ५ मेगावॉट आणि त्यावरील भाराच्या ग्राहकांच्या आणि सर्व निर्मिती केंद्रांच्या - त्यांची क्षमता कितीही असली तरीही - आंतर-राज्य मुक्त प्रवेशाच्या व्यवहारांचे काल व परिमाण निर्धारण राज्य भार प्रेक्षण केंद्राकडून राज्य ग्रिड संहितेमधील तरतूदींनुसार करण्यात येईल.

२४.३ ५ मेगावॉट पेक्षा कमी भार असलेल्या मुक्त प्रवेश ग्राहकांच्या आणि स्व-वापरासाठीच्या विद्युत प्रकल्पांच्या संबंधात कोणतेही काल-परिमाण निर्धारण करण्यात येणार नाही.

**२५. मीटरच्या नोंदी आणि संदेशवहन**

२५.१ मुक्त प्रवेश ग्राहक आणि सर्व निर्मिती केंद्रांकरिता, त्यांची क्षमता कितीही असली तरी, वितरण परवानाधारकाकडून विशेष ऊर्जा मीटर ग्राहकांच्या खर्चाने बसविण्यात येतील;

परंतु असे की, अशा मीटरची खरेदी, वितरण परवानाधारकाकडून किंवा वितरण परवानाधारकाने यथोचितपणे मान्यता दिलेल्या कोणत्याही

पुरवठादाराकडून, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे व चालविणे) विनियम, २००६ आणि त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणाना अनुसरुन असलेल्या तपशीलवार वैशिष्ट्यांसह, करण्यात येईल;

परंतु असेही की, वितरण परवानाधारकाकडून विनिर्दिष्ट करण्यात येणारी तपशीलवार वैशिष्ट्ये ही राज्य भार प्रेषण केंद्राच्या ऊर्जा लेख्यांच्या संबंधातील गरजांना अनुसरुन असावीत.

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारक, ज्यांच्याकडून विशेष ऊर्जा मीटर खरेदी करुन बसवता येतील अशा किमान दोन मीटर उत्पादकांची नावे विनिर्दिष्ट करावीत.

२५.२ विशेष प्रकारच्या ऊर्जा मीटरमुळे वेळेच्या गटवारीनुसार झालेला ॲक्टिव्ह वीज वापर आणि व्होल्टेजनुसार झालेला रिॲक्टिव्ह वीज वापर यांची मोजणी राज्य ग्रिड संहितेनुसार होईल.

२५.३ वितरण परवाना आणि कनेक्टर यांची मीटर बसविणे, देखभाल करणे, मीटरची चाचणी करणे आणि दोष असलेली , हरवलेली व जळालेली मीटर ह

हाताळणे, यांच्याबाबतीत जबाबदारी ही, आयोगाने वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्याकरीता अनुक्रमे विद्युत पुरवठा संहिता आणि कृतीच्या मानकांच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

२५.४ ग्राहकांच्या मीटर मधील नोंदी प्रत्येक दोन महिन्यातून किमान एकदा घेण्याची जबाबदारी वितरण परवानाधारकाची राहील.

परंतु असे की, मीटरमधील नोंदी घेण्याच्या वेळी पुरवठादाराच्या प्राधिकृत प्रतिनिधीला उपस्थित राहण्याचा हक्क असेल;

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारकाच्या प्राधिकृत प्रतिनिधीला मीटर मधील नोंदी घेण्यासाठी, तपासणी व चाचणी करण्यासाठी ग्राहकाच्या जागेत प्रवेश करण्याचा हक्क, ज्याप्रमाणे अधिनियम आणि विद्युत पुरवठा संहितेनुसार वितरण परवानाधारकाच्या स्वतःच्या ग्राहकांच्या बाबतीत असतो, त्याप्रमाणे असेल.

२५.५ वितरण परवानाधारक किंवा राज्य भार प्रेषण केंद्राने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला विशेष ऊर्जा मीटर्स तपासणीसाठी खुली असतील.

२५.६ सर्व मुक्त प्रवेश ग्राहक केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या मीटरसंबंधीच्या मानकांचे पालन करतील.

परंतु असे की, मुक्त प्रवेश देण्यासाठीची मोजणीची सर्व ठिकाणे राज्य मीटर संहितेचे पालन करतील.

परंतु असे की, राज्य मीटर संहितेमध्ये मोजणीच्या ज्या ठिकाणंची व्याख्या करण्यात आलेली नसेल त्यांची व्याख्या राज्य भार प्रेषण केंद्राकडून राज्यात ऊर्जा लेखा सुकर करण्यासाठी करण्यात येईल.

२५.७ राज्य भार प्रेषण केंद्र रिमोट ट्रान्समिशन युनिट- डेटा कॉन्सन्ट्रेटरची (आर टी यु-डीसी) तपशीलवार वैशिष्ट्ये विनिर्दिष्ट करेल आणि प्रत्यक्ष वेळेच्या संनियंत्रणासाठी त्याच्या स्थापनेची पडताळणी करेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्राने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीद्वारे तपासणीसाठी विशेष ऊर्जा मीटर्स खुली असतील.

२५.८ ऊर्जा लेख्यांच्या प्रयोजनासाठी ऊर्जा मीटरमधील माहिती राज्य भार प्रेषण केंद्राला **ऑन-लाइन** कळविण्यात येईल.

२५.९ मुक्त प्रवेश ग्राहक आणि वितरण परवानाधारक आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्र यांच्यातील प्रत्यक्ष संदेशवहनाचा खर्चाची व्याख्या वितरण परवानाधारक आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्र यांच्याकडून करण्यात येईल आणि खर्च मुक्त प्रवेश ग्राहकाला सहन करावा लागेल.

२५.१० ऊर्जा लेल्ख्यांकरिता राज्य भार प्रेषण केंद्राला ऊर्जा मीटरमधील माहिती पुरविण्याची जबाबदारी संयुक्तपणे मुक्त प्रवेश ग्राहक आणि तो जोडलेल्या असलेल्या वितरण परवानाधारकाची राहील.

२५.११ निर्मिती कंपनीने मुक्त प्रवेशाचा पर्याय स्वीकारल्यास अशी, कंपनी राज्य भार प्रेषण केंद्राला प्रत्यक्ष निर्मिती होत असताना तिचे संनियंत्रण करणे शक्य व्हावे यासाठी निर्मितीची वास्तविक स्थिती राज्य भार प्रेषण केंद्राला दिसेल याची व्यवस्था करेल.

२५.१२ मुक्त प्रवेश ग्राहकाकडे दूरध्वनी/मोबाइल, फॅक्स आणि ई-मेलची सुविधा असेल. त्याच्या संदेशवहन यंत्रणेचा तपशील वितरण परवानाधारक आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्राला कळविण्यात येईल.

## २६. सुधारणा

निर्धारित ऊर्जेमध्ये सुधारणा करण्यास, आय.इ.जी.सी किंवा राज्य ग्रिड संहितेमधील तरतरुदी नुसार, जसे असेल तसे, परवानगी देण्यात येईल.

## २७. हानी

२७.१ <u>पारेषण हानी :</u>

२७.१.१ आंतर-राज्य पारेषण

(अ) दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश : केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तरतूदींनुसार पारेषण यंत्रणेमधील विभागणी केलेली ऊर्जा हानी खरेदीदारांना सहन करावी लागेल.

(ब) अल्प-कालीन मुक्त प्रवेशः केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तरतूदींनुसार पारेषण यंत्रणेमधील ऊर्जा हानी मुक्त प्रवेश ग्राहकाला सहन करावी लागेल.

२७.१.२ राज्यांतर्गत पारेषण :

आयोगाने लागू असलेल्या वर्षासाठी काढलेल्या बहु-वर्षीय वीज दर/ वार्षिक कामगिरीचा आढावा/ वीज दराच्या आदेशात निश्चित केलेल्या पारेषण हानिची विभागणी मुक्त प्रवेश ग्राहाकाने प्रत्यक्ष घेतलेल्या ऊर्जेच्या प्रमाणात करण्यात येईल आणि ती वस्तुरुपात अदा करण्यात येईल.

२७.२. <u>वितरण हानी</u>

आयोगाने लागू असलेल्या वर्षासाठी काढलेल्या बहु-वर्षीय वीज दर/ वार्षिक कामगिरीचा आढावा/ वीज दराच्या आदेशातील, विविध व्होल्टेज पातळीकरिता वितरण यंत्रणेमधील यंत्रणेची हानी निश्चित करण्यात येईल; आणि तिची विभागणी मुक्त प्रवेश ग्राहकांनी प्रत्यक्ष घेतलेल्या ऊर्जेच्या प्रमाणात करण्यात येईल आणि ती संबंधित व्होल्टेज पातळीवर वस्तु-रुपात अदा करण्यात येईल.

## भाग एफ : असंतुलन आणि रिॲक्टिव ऊर्जा आकार

## २८. असंतुलन आकार

२८.१ दीर्घ-कालीन प्रवेश किंवा मध्यम-कालीन मुक्त प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश दिल्यानंतर सर्व व्यवहारांचे डे-अहेड तत्त्वावर आंतर-राज्य

व्यवहारांकरिता आय इ जी सी आणि राज्यांतर्गत व्यवहारांकरिता राज्य ग्रिड संहितेमधील संबंधित तरतुदींनुसार काल-परिमाण नियोजन (शेड्युलिंग) करण्यात येईल.

२८.२ मुक्त प्रवेश ग्राहकांच्या संबंधात निर्धारित आणि प्रत्यक्ष वीज पुरवठा आणि/किंवा वापर यामधील तफावतीची हिशोबपूर्ती खालीलप्रमाणे करण्यात येईल.

२८.२.१ <u>ज्यादा वीज वापरः -</u>

मुक्त प्रवेश ग्राहकाने वापरलेल्या ज्यादा विजेकरिता खालील **३ पर्यायांपेक्षा** उच्च दर आकारण्यात येईल.

(एक) केंद्रीय विद्युत आयोगाने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या अनिर्धारित विनिमय (युआय) आकारांसह कोणताही **भार आकार** (कंज्येस्शन चार्ज ), किंवा

(दोन) राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेली यंत्रणा सर्वोच्च किंमत (सिस्टिम मार्जिनल प्राइस-एस एम पी), किंवा

(तीन) वीज दराच्या अनुसूचीमध्ये निश्चित करण्यात आलेला तात्पुरता वीज दर.

परंतु असे की, आंतर-राज्य अनिर्धारित विनिमय (यु आय) पद्धतीखाली कोणतेही प्रोत्साहन-अनुदान मिळाले असल्यास हे प्रोत्साहन अनुदान वितरण परवानाधारक ठेवून घेईल.

२८.२.२ <u>कमी वीज वापर</u>

मुक्त प्रवेश ग्राहकाने कमी वीज वापरल्यास त्याला वितरण परवानाधारकाकडून कोणतेही आकार अदा केले जाणार नाहीत.

परंतु असे की, आंतर-राज्य अनिर्धारित विनिमय (यु आय) पद्धतीखाली जर कोणताही दंड आकारण्यात आला असेल तर, वितरण परवानाधारकाकडून या आकाराची वसूली मुक्त प्रवेश ग्राहकाकडून करण्यात येईल;

परंतु आणखी असे की, आंतर-राज्य यु आय पद्धतीखाली जर कोणतेही प्रोत्साहन-अनुदान प्राप्त झाले तर हे प्रोत्साहन-अनुदान वितरण परवानाधारकाकडून ठेवून घेण्यात येईल.

२८.२.३ राज्यांतर्गत पारेषण आणि /किंवा वितरण यंत्रणा खंडित झाल्यामुळे निर्धारित वीज न वापरणे:

राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा आणि/ किंवा वितरण परवानाधारकाचे जाळे खंडित झाल्यास, मुक्त प्रवेश ग्राहक निर्धारित ऊर्जेचा वापर करु शकत नसेल तर, पुरवठा करण्यात आलेली वीज ही **बँकेत जमा झालेली** वीज म्हणून समजण्यात येईल आणि मुक्त प्रवेश ग्राहकाला अशी वीज वितरण परवानाधारकाला २४ तासांची आगाऊ नोटीस देऊन तीन महिन्यांच्या कालावधीत वापरण्यास परवानगी देण्यात येईल;

परंतु असे की, ज्या वेळेच्या गटवारीत वीज ठेवण्यात आली असेल, त्याच वेळेच्या गटवारीत मुक्त प्रवेश ग्राहकाला अशा विजेचा वापर करता येईल.

परंतु असे की, जर मुक्त प्रवेश ग्राहक अशी **बँकेतील वीज** विनिर्दिष्ट केलेल्या तीन महिन्यांच्या कालावधीत वापर करु शकला नाही तर अशी वीज व्यपगत झाली, असे समजण्यात येईल;

२८.३ परंतु असे की, प्रत्यक्ष विजेच्या पुरवठ्याशी मर्यादित मुक्त प्रवेश ग्राहक म्हणून असलेले निर्धारित हक्क आणि वितरण परवानाधारकाचा ग्राहक म्हणून मंजूर केलेली करारांतर्गत मागणी (या दोघांची बेरीज ही अनुज्ञेय वापर असेल) यांच्या बेरजेशी सममूल्य एकूण भारा इतका विजेचा वापर

करण्यास ग्राहकाला परवानगी देण्यात येईल. नोंदणी झालेला वापरामध्ये, मुक्त प्रवेश ग्राहक म्हणून असलेल्या निर्धारित हक्कांचे प्रथम समायोजन करण्यात येईल आणि उरलेली शिल्लक ही ग्राहकाच्या मंजूर करारांतर्गत मागणीचे समायोजन करण्यासाठी वापरण्यात येईल. नोंदलेला कमाल वापराचा हिशोब/आकारणी खालील प्रमाणे असेल -

२८.३.१ जेव्हा विजेचा ज्यादा वापर हा वितरण परवानाधारकाचा ग्राहक म्हणून मंजूर करारांतर्गत मागणी म्हणून हाताळण्यात येणार असेल तर, वरील विनियम २८.३ नुसार मेळ घातल्यानंतर असलेला ज्यादा वापर, हा मागणी अधिभार म्हणून ग्राहकावर, अशा ग्राहकांना लागू असलेल्या किरकोळ वीज दरातील सारख्या तरतुदींतील रितीनुसार, लावण्यात येईल;

२८.३.२ मुक्त प्रवेश ग्राहक म्हणून निर्धारित हक्कापेक्षा जेव्हा ग्राहकाचा नोंदलेला वीज वापर कमी असेल तेव्हा तो वरील विनियम २८.२.२ खाली कमी वापर म्हणून समजण्यात येईल.

तथापि, ग्राहकाचे नियमन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती ) विनियम, २००५ मधील वेळोवेळी केलेल्या सुधारणाद्वारे, आणि आयोगाने मान्यता दिलेल्या वीज दरातील अनुसूचीनुसार करण्यात येईल.

२८.४ निर्मिती कंपनी/ वीज व्यापार परवानाधारकाने घेतलेल्या मुक्त प्रवेशाच्या संबंधातील निर्धारित आणि प्रत्यक्ष वीज पुरवठा आणि/किंवा वापर यांच्यातील तफावतीची हिशोबपूर्ती खालीलप्रमाणे करण्यात येईलः

२८.४.१ ज्यादा वीज पुरवठा :

वीज निर्माता/ व्यापाऱ्याने निर्धारित केलेल्या पुरवठ्यापेक्षा ज्यादा केलेल्या पुरवठ्यामुळे जर ग्रिडचा फायदा झाला तर असा ज्यादा वीज पुरवठ्याचा हिशोबपूर्ती ही आंतर-राज्य उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली लागू असलेल्या अनिर्धारित विनिमय (यु आय) आकाराने किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या यंत्रणा सर्वोच्च किंमतीने (सिस्टिम मार्जिनल प्राइस - एम एम पी) किंवा राज्यात कार्यरत असलेल्या निर्मिती कंपनीच्या सर्वात कमी अस्थिर खर्चाने, जो कमी असेल त्यानुसार, करण्यात येईल.

वीज निर्माता/ व्यापाऱ्याने निर्धारित केलेल्या पुरवठ्यापेक्षा ज्यादा करण्यात आलेल्या वीज पुरवठा जर ग्रिडला घातक ठरला तर अशा ज्यादा वीज पुरवठ्याकरिता मुक्त प्रवेश निर्माता/व्यापारी, आंतर-राज्य उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली लागू असलेल्या अनिर्धारित विनिमय (यु आय) आकाराने किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या यंत्रणा सर्वोच्च किंमतीने, (सिस्टिम मार्जिनल प्राइस - एम एम पी), जे जास्त असेल त्या नुसार, राज्य पूल मध्ये अदा करेल.

परंतु असे की, परवानाधारक नोडल एजन्सी असल्यामुळे, मुक्त प्रवेश निर्माता/व्यापाऱ्याला असा आकार लागू करेल आणि वसूल करेल व तो राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित

वीज दराच्या पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या राज्य पूल खात्यामध्ये अदा करेल.

२८.४.२ कमी वीज पुरवठा

मुक्त प्रवेश निर्मात्याने पालन करावयाच्या निर्धारित पुरवठ्यापेक्षा कमी पुरवठा झाल्यास, त्याची भरपाई ग्रिडमधून करण्यात येईल व त्याची किंमत, आंतर-राज्य उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली लागू असलेल्या अनिर्धारित विनिमय (यु आय) आकाराने किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या यंत्रणा सर्वोच्च किंमतीने, (सिस्टिम मार्जिनल प्राइस - एम एम पी), यापैकी जे जास्त असेल त्यानुसार, निर्माता/व्यपारी यांच्याद्वारे वितरण परवानाधारकाला अदा करण्यात येईल. त्याशिवाय, मुक्त प्रवेश निर्मात्याच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी प्रादेशिक भार प्रेषण केंद्र आणि किंवा राज्य भार प्रेषण केंद्राने, कोणताही, **भार आकार** (कंज्येस्शन चार्ज) निश्चित केला असेल तर तो वितरण परवानाधारकाला अदा करण्यात येईल;

परंतु असे की, वितरण हानी, जर कोणताही निर्माता/व्यापारी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला थेट जोडलेला असेल तर त्याच्याकडून वसूल करण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, जर विजेचा कमी पुरवठा सतत दोन दिवस चालू राहिला तर, राज्य भार प्रेषण केंद्र काल-

परिमाण नियोजनामध्ये (शेड्युलिंग) सुधारणा करण्यासाठी वीज निर्मात्याला/व्यापाऱ्याला नोटीस देईल. जर वीज निर्माता/ व्यापारी मुक्त प्रवेश काल-परिमाण नियोजनाप्रमाणे (शेड्युलिंग) प्रमाणे विजेचा पुरवठा करु शकला नाही तर अशा परिस्थितीत वीज निर्माता/व्यापाऱ्याने काल-परिमाण नियोजनामध्ये (शेड्युलिंग) ताबडतोब सुधारणा करावी किंवा अन्यथा त्यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ आणि त्यात वेळोवेळी केलेल्या सुधारणामध्ये निश्चित करण्यात आलेला दंड आकारण्यात येईल. वीज निर्माता/व्यापारी मुक्त प्रवेश आकार संपूर्ण कालावधीकरिता पूर्ण राखीव क्षमतेसाठी अदा करण्यात जबाबदार राहील.

२८.४.३ <u>राज्यामधील निर्मात्यांना जेव्हा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पध्दतीत सहभागीदार म्हणून घोषित करण्यात येईल तेव्हा त्यांना खालील बाबी लागू राहतील :</u>

(अ) वेळेच्या कोणत्याही १५ मिनिटाच्या गटवारितील घोषित क्षमतेच्या १०५ टक्क्यापर्यंतची कोणतीही निर्मिती आणि एकूण सरासरी ही घोषित सरासरी क्षमतेच्या १०१ टक्क्यापर्यंत दर एका दिवसात जात असेल तर ती गेमींग म्हणून संबोधण्यात येणार नाही आणि निर्मात्याला अनिर्धारित विनियम (यु आय) आकार जे राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली यंत्रणा सर्वोच्च किंमत (सिस्टिम मार्जिनल प्राइस एस एम पी) म्हणून निश्चित करण्यात आले आहेत, ते मिळण्याचा हक्क राहील. हे आकार निर्धारित वीज

निर्मितीच्या घोषित क्षमतेपेक्षा जास्त झालेल्या वीज निर्मितीला लागू असतील.

(ब) विहित मर्यादांपेक्षा जास्त झालेल्या कोणत्याही वीज निर्मितीकरिता, राज्यभार प्रेषण केंद्र त्यात कोणतेही गेमींग नसल्याची खात्री करण्यासाठी तपास करेल आणि राज्यभार प्रेषण केंद्राला जर गेमींग असल्याचे आढळून आले तर, संबंधित अनिर्धारित विनिमय आकार जे निर्मिती केंद्राला अशा अतिरिक्य वीज निर्मितीमुळे मिळणार असतील ते शून्यवत करण्यात येतील आणि या संबंधितील रक्कम ती लाभ धारकांच्या अनिर्धारित विनिमय खात्यामध्ये निर्मिती केंद्रामधील त्यांच्या असलेल्या क्षमतेच्या हिश्याच्या प्रमाणात समायोजित करण्यात येईल.

२८.५ निर्मिती कंपनी/ व्यापारी परवानाधारकाने घेतलेल्या मुक्त प्रवेशाच्या संबंधात परवानाधारकाची वहन यंत्रणा बंद पडल्यामुळे विजेचे वहन करण्यात आलेले अपयश खालील प्रमाणे हाताळण्यात येईल :-

२८.५.१ <u>आंतरराज्य विक्री</u>

मुक्त प्रवेश निर्माता / व्यापाऱ्याने दिलेले काल-परिमाण नियोजन (शेड्यूल) राज्य भार प्रेषण केंद्राकडून पश्र्चिम विभागीय भार प्रेषण केंद्राकडे पाठवण्यात येईल. राज्याबाहेरील स्रोतांमधील वितरण परवानाधारकाच्या हिश्याचे त्यानुसार समायोजन करण्यात येईल आणि मुक्त प्रवेश निर्माता व्यापाऱ्याने नियोजन केलेली ऊर्जा मुक्त प्रवेश निर्माता / व्यापाऱ्याने निश्चित केलेल्या खरेदी दाराला पाठविण्यात येईल;

मुक्त प्रवेश निर्माता / व्यापाऱ्याने नियोजन केलेल्या ऊर्जेचे वहन वितरण परवानाधारक, वितरण परवानाधारकाच्या वहन यंत्रणेमधील बिघाड

झाल्यामुळे, करु शकत नसेल तर, वितरण परवानाधारक, मुक्त प्रवेश निर्मात्याला/ व्यापाऱ्याला, वितरण परवानाधारकाच्या वीज दराच्या आदेशात दीर्घ-कालीन वीज खरेदीकरिता सरासरी खर्चाच्या मर्यादे इतकी रक्कम, वितरण परवानाधारकाच्या वहन यंत्रणेत बिघाड झाल्यामुळे वितरण परवानाधारकाकडून वहन न केलेल्या प्रत्यक्ष ऊर्जेकरिता, मुक्त प्रवेश निर्मात्या/व्यापाऱ्याला आदा करेल.

२८.५.२ राज्यातंर्गत विक्री

मुक्त प्रवेश निर्मात्याला वितरण परवानाधारकाकडून, खरेदीदाराला वितरण परवानाधारकाने पुरवलेल्या ऊर्जेकरिता, राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली अनिर्धारित विनिमय दराने किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली निश्चित केलेल्या एस एम पी ने किंवा करारांतर्गत पुरवठादराने, जो कमी असेल त्यानुसार, अदा करेल.

परंतु असे की, ज्या कालावधीत विजेचे वहन करण्यात आले नसेल त्या कालावधीकरिता निर्माता/व्यापारी मुक्त प्रवेश पारेषण आणि वहन आकार राज्य यंत्रणेकरिता अदा करण्यास जबाबदार राहणार नाही.

२८.६ असंतुलन आकार अदा करण्यास उच्च प्राधान्य देण्यात येईल आणि संबंधित घटक (परवानाधारक किंवा मुक्त प्रवेश ग्राहक, जसे असेल तसे यांच्यासह) निर्देशित रक्कमेचा भरणा, विवरणपत्र निर्गमित झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत, राज्य भार प्रेषण केंद्रातर्फे चालविल्या जाणाऱ्या राज्य असंतुलन पूल खात्यामध्ये, करेल. असंतुलन आकारामुळे ज्या व्यक्तीला रक्कम मिळावयाची आहे त्या व्यक्तीला राज्य असंतुलन पूल खात्यामधून, तीन (३) कामाच्या दिवसात रक्कम आदा करण्यात येईल.

२८.७ वरील असंतुलन आकार आदा करण्यात जर दोन दिवसांपेक्षा अधिक विलंब झाला म्हणजेच विवरणपत्र निर्गमित करण्याच्या दिनांकापासून बारा (१२) दिवसांपेक्षा जास्त, चुकार पक्षकाराला ०.०४ टक्के या दराने विलंबाच्या प्रत्येक दिवसाकरिता व्याज द्यावे लागेल. व्याजाची ही वसुल केलेली रक्कम, ज्या व्यक्तीला ही रक्कम मिळावयाची होती, त्या व्यक्तीला रक्कत अदा करण्यास झालेल्या विलंबामुळे, अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यास सातत्याने विलंब झाल्यास तसे राज्य भार प्रेषण केंद्राकडून आयोगाला सुधारणात्मक कारवाई सुरु करण्यासाठी कळविण्यात येईल.

**२९ रिॲक्टीव ऊर्जा आकार**

२९.१ ५ मेगावॉट किंवा अधिक भार असणाऱ्या मुक्त प्रवेश ग्राहकांच्या संबंधात, मुक्त प्रवेश ग्राहकांकडून रिॲक्टीव ऊर्जा आकारांचा भरणा राज्य ग्रिड संहितेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तरतूदींनुसार करण्यात येईल.

२९.२ ५ मेगावॉट पेक्षा कमी भार असणाऱ्या मुक्त प्रवेश ग्राहकांच्या संबंधात, आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या पॉवर फॅक्टरच्या आधारे रिॲक्टीव ऊर्जा आकारांची परिगणना करण्यात येईल.

**भाग जी : वाणिज्यिक बाबी**

**३०. देयक तयार करणे, वसूली आणि वाटप**

या विनियमांखाली देय असणाऱ्या आकारांचे देयके खालील कार्यपद्धतीनुसार तयार करण्यात येतील :

३०.१ <u>आंतरराज्य व्यवहार :</u>

(अ) **अल्प-कालीन मुक्त प्रवेश**

(१) केंद्रीय पारेषण कंपनी आणि राज्य पारेषण कंपनीच्या यंत्रणांच्या वापरासाठीचे पारेषण आकार आणि प्रादेशिक भार प्रेषण केंद्रे आणि

राज्य भार प्रेषण केंद्रे यांना अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी द्यावयाच्या कामकाज आकारांची वसूली आणि वाटप, नोडल प्रादेशिक भार प्रेषण केंद्राकडून, केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

(२) वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेला जोडलेल्या अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक अशा वितरण परवानाधारकाला देय असणारे आकार वितरण परवानाधारकाला विनियम १६.३ प्रमाणे अदा करेल.

(ब) **दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश**

(१) राज्य भार प्रेषण केंद्रासह एकत्रित भार प्रेषण आणि संदेश वहन योजनेला देय असलेल्या आकारांची देयके तयार करणे, वसूली आणि वाटप केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

(२) राज्य भार प्रेषण केंद्राला देय असणाऱ्या आकारांची देयके राज्य भार प्रेषण केंद्राकडून राज्य पारेषण कंपनीला जोडलेल्या मुक्त प्रेवश ग्राहाकाला किंवा वितरण परवानाधारकाच्या वितरण जाळ्याकडे, पुढील कॅलेंडर महिन्याच्या तिसऱ्या (३) कामाच्या दिवसापूर्वी, थेट पाठविण्यात येतील.

(३) राज्य भार प्रेषण केंद्राकडून देयक प्राप्त झाल्यावर वितरण परवानाधारकाला जोडलेल्या मुक्त प्रवेश ग्राहकाला वितरण परवानाधारक विनियम १६३ प्रमाणे याचे देयक पाठवेल.

(४) वितरण जाळ्याला जोडलेला मुक्त प्रवेश ग्राहक विनियम १६४ प्रमाणे आकारांचा भरणा करेल. वितरण परवानाधारक राज्य पारेषण

कंपनी/राज्य भार प्रेषण केंद्र यांना देय असलेल्या रकमांचे वाटप मासिक तत्त्वावर करेल.

(५) राज्य पारेषण कंपनीला जोडलेला मुक्त प्रवेश ग्राहक देयक रक्कमेचा विनियम १६.४ प्रमाणे भरणा करेल.

३०.२ **राज्यांतर्गत व्यवहार :**

(अ) **अल्प-कालीन मुक्त प्रवेशः**

वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेला जोडलेला अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक, वितरण परवानाधारकाला देय असलेल्या आकारांचा भरणा, विनियम १६.४ प्रमाणे करेल.

(ब) **दीर्घ-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेशः**

राज्य भार प्रेषण केंद्र त्यांना देय असलेल्या देयकांचा तपशील पुढील कॅलेंडर महिन्याच्या तिसऱ्या दिवसापर्यंत वितरण परवानाधारकाला कळवेल. वितरण परवानाधारक हे आकार वेगळे दाखवून, त्याला प्राप्त होऊ शकणाऱ्या आकारांसह, मुक्त प्रवेश ग्राहाकाला त्याचे देयक वरील महिन्याच्या पाचव्या (५) दिवसापर्यंत पाठवेल. मुक्त प्रवेश ग्राहक या आकारांचा भरणा विनियम १६.४ प्रमाणे करेल. वितरण परवानाधारक राज्य भार प्रेषण केंद्राला देय असणाऱ्या रकमांचे वाटप मासिक तत्त्वावर करेल.

## ३१. विलंब भरणा अधिभार

जर या विनियमांखाली देय असणाऱ्या आकारांच्या देयकाचा भरणा मुक्त प्रवेश ग्राहाकाने देय दिनांकानंतर करण्यास विलंब केला तर, या अधिनियमाखाली व त्याखाली करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही

विनियमांखालील कारवाईस बाधा न येऊ देता, विलंब भरणा अधिभार प्रती महिना १.२५ टक्के या दराने आकारण्यात येईल.

## ३२. देयक अदा न करणे

मुक्त प्रवेश ग्राहकाकडून देय असणारा कोणताही आकार किंवा रक्कम त्याने अदा न केल्यास, त्यामुळे या विनियमाचे पालन झाले नाही असे मानण्यात येईल. वितरण परवानाधारक, असे आकार दावा दाखल करुन वसूल करण्याच्या त्याच्या अधिकारास बाधा न येऊ देता, ग्राहकाला पंधरा (१५) दिवसाची आगाऊ नोटीस देवून मुक्त प्रवेश बंद करु शकेल.

राज्य भार प्रेषण केंद्राला देय असणारे आकार अदा न केले गेल्यास, हे केंद्र अशा कसूरदार मुक्त प्रवेश ग्राहाकाकरिता वीज पुरवठ्याचे नियोजन करणे नाकारु शकेल आणि वितरण परवानाधारकाला अशा ग्राहकाची ग्रिडला दिलेली जोडणी खंडित करण्याचे निर्देश देऊ शकेल.

## ३३. भरणा सुरक्षा पद्धत

दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाच्या संदर्भात, मुक्त प्रवेशासाठीचा अर्जदार, विविध आकार वसूल करण्यासाठी जबाबदार असलेल्या संस्थेच्या नावे, विविध आकारांच्या अंदाजित रक्कमेकरिता, एक परत न करता येण्याजोगे लेटर ऑफ क्रेडिट दोन महिन्याच्या कालावधीकरिता उघडेल.

## ३४. वीज पुरवठा करण्याची आणि वापराची ठिकाणे बदलण्यात लवचिकता

३४.१ दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश ग्राहाकाला विजेचा पुरवठा करण्याची आणि/किंवा वीज पुरवठा केल्याची ठिकाणे बदलण्याची लवचिकता वर्षातून दोन वेळा

असेल. ही सुविधा अशा ग्राहकांकरिता संबंधित वितरण परवानाधारकाने त्यामुळे यंत्रणेवर होणाऱ्या परिणामांच्या करावयाच्या अभ्यासाला अधीन राहून असेल.

परंतु असे की, अर्जदाराला अशी लवचिकता देत असताना, विद्यमान ग्राहकांच्या अधिकारावर विपरित परिणाम होणार नाही.

३४.२ संबंध वर्षाकरिता मुक्त प्रवेश घेणारा मध्यम-कालीन ग्राहक देखील प्रवेशाची आणि निर्गमनाची ठिकाणे वर्षातून दोन वेळा, व्यवहार्यतेस अधिन राहून बदलू शकेल.

३४.३ वीज निर्मिती किंवा निर्मितीशी संबंधीत जाळे दुरुस्तीसाठी आकस्मिकपणे बंद ठेवावे लागले तर, वितरण परवानाधारक अल्प-कालिन ग्राहाकाला वीज पुरवठा करण्याचे ठिकाण किंवा ठिकाणे बदलण्यास परवानगी, तांत्रिक दृष्ट्या व्यवहार्य असल्यास देवू शकेल.

परंतु आणखी असे की, असा बदल करण्यास मुक्त प्रवेशाच्या मुदतीत फक्त एकदाच परवानगी देण्यात येईल.

परंतु असे की, दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन प्रवेशाच्या संदर्भात, विद्यमान मुक्त प्रवेश ग्राहकाकडून विजेचा पुरवठा करण्याच्या आणि वीज पुरवठा घेण्याच्या ठिकाणात करावयाच्या बदलासाठीचा आगाऊ अर्ज वितरण परवानाधारकाला कमीत कमी तीन महिने आधि सादर करण्यात येईल.

परंतु असे की, पहिला बदल परिणामकारक झाल्यापासून सहा महिने झाल्यानंतरच, दुसरा बदल करण्यास परवानगी देता येईल. वितरण परवानाधारकाने असा अभ्यास करण्यासाठी केलेल्या सर्व खर्चाची प्रतिकृती अशा ग्राहकांकडून पूर्णपणे करण्यात येईल.

परंतु असे की, विजेचा पुरवठा करण्याच्या आणि वीज पुरवठा घेण्याच्या ठिकाणात कोणताही बदल, मुक्त प्रवेशासाठी वापरावयाच्या विजेच्या परिमाणात कोणताही बदल न झाला तरच अशी परवानगी देण्यात येईल.

परंतु आणखी असे की, असा बदल वितरण परवानाधारकाच्या जाळ्याला जोडलेल्या किंवा जोडणी घेण्याचा उद्देश असलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती कंपनीला वीज पुरवठा करण्याच्या ठिकाणात बदल करण्यात येत असल्यास, आणि अशा कंपनीचा जर विजेची विक्री, विनियम ३.१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पात्र व्यक्तीला किंवा परवानाधारकाला करण्याचा उद्देश असेल आणिच अशी वीज उद्देशित लाभधारकाने घेतली नाही तर, अशी निर्मिती कंपनी ज्या वितरण परवानाधारकला जोडलेली असेल त्या वितरण परवानाधारकाकडील अशी सर्व ऊर्जा व्यपगत ऊर्जा म्हणून मानण्यात येईल.

**भाग आय : माहिती प्रणाली**

## ३५. माहिती प्रणाली

३५.१ प्रत्येक वितरण परवानाधारक इंटरनेटवर आधारित माहिती प्रणाली ठेवेल व त्यात खालील तपशील देण्यात येईल :-

(अ) अर्जाचा नमूना, अर्ज सादर करण्याची कार्यपद्धती आणि अर्जा सोबत पाठविण्याचे शूल्क;

(ब) वितरण यंत्रणेची जोडणी व वापर करण्यासाठी जोडणी कराराचा नमूना;

(क) आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील असे वहन आकार आणि क्रॉस सबसिडी अधिभार; आणि

(ड) दीर्घ-कालीन प्रवेश, मध्यम-कालीन प्रवेश आणि चालू अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकांच्या बाबतीत सद्य-स्थिती अहवाल, ज्यात खालील बाबींचा समावेश असेल :-

(१) ग्राहकाचे नाव

(२) मुक्त प्रवेश मंजूर केलेला कालावधी (सुरुवातीचा दिनांक व समाप्तीचा दिनांक);

(३) वीज पुरवठा करण्याचे ठिकाण;

(४) वीज पुरवठा घेण्याचे ठिकाण;

(५) वापरलेली पारेषण यंत्रणाव/वितरण यंत्रणा;

(६) वापरलेली मुक्त प्रवेश क्षमता; आणि

(७) मर्यादित अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकांच्याबाबतीत मुक्त प्रवेश कालावधीचे प्रत्येक दिवसाचे काल-परिमाण नियोजन (शेड्यूल);

परंतु असे की, पॉवर एक्सेंज मार्फत विजेच्या विक्री/खरेदीच्या बाबतीत वीज पुरवठा घेण्याची/ वीज पुरवठा करण्याची ठिकाणे केंद्रीय विद्युत नियामक आयोग (विजेची बाजारपेठ) विनियम, २०१० मधील तरतूदींन प्रमाणे असतील.

३५.२ सर्वोच्च भार प्रवाह आणि अति उच्चदाब केंद्रातून निघणाऱ्या सर्व अति उच्चदाब वाहिन्या आणि उच्चदाब वाहिन्यावरिल राखीव क्षमतेसह उपलब्ध क्षमता.

**भाग जे : वितरण यंत्रणेला जोडलेल्या निर्मिती केंद्राला मुक्त प्रवेश**

## ३६. व्याप्ती

वितरण यंत्रणेला जोडलेल्या निर्मिती केंद्राला मुक्त प्रवेश हवा असल्यास अशा निर्मिती केंद्राला, विनियम ३६.१ खाली समाविष्ट असणारे प्रकरण

वगळता, दीर्घ-कालीन प्रवेश, मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेश या सारख्या वेगवेगळ्या प्रसंगासाठी मुक्त प्रवेशाची मागणी करणाऱ्या ग्राहकाला लागू असलेली कार्यपद्धती अनुसरावी लागेल. त्याचप्रमाणे, अशा निर्मिती केंद्राला, क्रॉस सबसिडी अधिभार आणि अतिरिक्त अधिभार जे मुक्त प्रवेश मागणाऱ्या ग्राहकाला लागू असतात ते वगळून, अर्जाचे शुल्क आणि अन्य मुक्त प्रवेश आकार देखील त्याचप्रमाणे भरावे लागतील.

३६.१ मुक्त प्रवेशाची मागणी करणाऱ्या निर्मिती केंद्राला ते ज्या वितरण परवानाधारकाला जोडलेले असेल त्याच वितरण परवानाधारकाकडे विहित नमुन्यामध्ये अर्ज करेल

परंतु असे की, वितरण परवानाधारकाला जोडलेल्या ग्राहकाचा उद्देश, नूतनशील ऊर्जेवर आधारित निर्मात्याकडून वीज पुरवठा घेण्याचा असेल तर तो ग्राहक अशा नुतनशील निर्मात्याकडून मुक्त प्रवेशाची मागणी करेल. ही मागणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० मध्ये तरतूद करण्यात आलेल्या नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानांकरिता निश्चित केलेल्या क्षमता वापर घटकाशी सममूल्य इतक्या विजेच्या परिमाणाकरिता करण्यात आलेली असेल.

## ३७. अर्जाची छाननी

वितरण परवानाधारक, अशा निर्मिती केंद्राच्या अर्जाची छाननी करताना, खालील पध्दतीचा अवलंब करेल.

३७.१ मुक्त प्रवेशाची मागणी करणाऱ्या निर्मिती केंद्राच्या अर्जाची छाननी करताना, वितरण परवानाधारक खालील बाबींची पडताळणी करेल-

(अ) वेळेच्या गटवारीनुसार ऊर्जेचे **मापन** करण्यासाठी आवश्यक पायाभूत सोयी-सुविधांच्या अस्तित्त्वाबाबत आणि प्रचलित राज्य ग्रिड संहितेमधील तरतुदींनुसार लेखा ठेवण्यात येत असल्याची; आणि

(ब) वितरण जाळ्यात शिल्लक क्षमतेची उपलब्धता.

३७.२ जेथे वितरण जाळ्यामध्ये आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा आणि शिल्लक क्षमता असल्याचे सिद्ध झाले आहे, वितरण परवानाधारक ग्राहकाला लागू असलेल्या येथे वर उल्लेखिलेल्या विनियम ९.२ मध्ये निर्देशित केलेल्या कालमर्यादेत त्याची मान्यता कळवेल.

परंतु असे की, जर आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध नसतील अशा प्रकरणी, वितरण परवानाधारक अशा निर्मिती कंपनी किंवा वितरण परवानाधारकाला तांत्रिक आवश्यकता, करुन घ्यावयाच्या कामाचा तपशील, त्यासाठी अदा करावयाचे आकार आणि कामे पुरी करुन घ्यावयासाठी अंदाजित कालावधी कळवेल ज्यामुळे अशा निर्मिती कंपनीला असा विजेचा पुरवठा करणे शक्य होईल. वितरण परवानाधारकाला या विनियमांखाली मुक्त प्रवेश देताना झालेला सर्व वाजवी खर्च अशा निर्मिती कंपनीकडून वसूल करण्याचा हक्क राहील

परंतु आणखी असे की, निर्मिती कंपनीकडून वसूल करावयाचा खर्च निश्चित करताना वितरण परवानाधारक, अधिनियमाच्या कलम ६४ च्या उप-कलम (१) मधील तरतूदींनुसार वीज दर निश्चित करण्यासाठी करावयाच्या अर्जाचा एक भाग म्हणून वितरण परवानाधारकाने सादर

करावयाच्या गुंतवणूक योजनेनुसार, हाती घेण्यासाठी नियोजित केलेल्या कामाचा तपशील विचारात घेईल.

३७.३ जर अर्ज कोणत्याही प्रकारे अपूर्ण अथवा सदोष असल्याचे आढळून आले तर वितरण परवानाधारक, अर्जदाराला अशी उणीव किंवा दोष ई-मेलने किंवा फॅक्सद्वारे किंवा संदेशवहनाच्या मान्यताप्राप्त नेहमीच्या अन्य कोणत्याही मार्गाने, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन (२) दिवसात कळवेल.

३७.४ अर्ज योग्य असल्याचे आढळून आल्यावर, आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा नसल्याच्या कारणास्तव किंवा वितरण जाळ्यामध्ये शिल्लक क्षमता उपलब्ध नसल्यामुळे, वितरण परवानाधारकाने संमती देण्याचे नाकारले तर असा नकार, त्याबाबतच्या कारणांसह, अर्ज प्राप्त झाल्यापासून तीन (३) कामाच्या दिवसांत ई-मेल अथवा फॅक्सद्वारे किंवा संदेशवहनाच्या नेहमीच्या अन्य कोणत्याही मान्यता देण्यात आलेल्या संपर्क साधनांनी अर्जदाराला कळवेल.

३७.५ आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे वहन आकार निर्मिती केंद्र वितरण परवानाधारकाला आदा करेल. वितरण यंत्रणा उपलब्ध नसताना मानीव निर्मितीचा प्रश्न निर्मिती केंद्र आणि वितरण परवानाधारक यांच्यात परस्पर समझोत्याने सोडवण्यात येईल.

३७.६ वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेला जोडलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती कंपनीचा जर विजेची विक्री, विनियम ३.१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पात्र व्यक्तीला किंवा अशी कंपनी ज्या वितरण परवानाधारकाला जोडलेली असेल त्याशिवाय अन्य परवानाधारकाला किंवा या विनियमांखालील पॉवर एक्स्चेंजमध्ये करण्याचा उद्देश असेल आणि जर अशी वीज उद्देशित

लाभधारकाने घेतली नाही तर, अशी निर्मिती कंपनी ज्या वितरण परवानाधारकला जोडलेली असेल त्या वितरण परवानाधारकाकडील अशी सर्व ऊर्जा व्यपगत ऊर्जा म्हणून मानण्यात येईल.

**भाग के - संकीर्ण**

## ३८ पारेषण परवानाधारकाच्या जबाबदा-या

३८.१ ज्या ग्राहक किंवा व्यक्तीला या विनियमांखाली मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे असा ग्राहक किंवा व्यक्ती पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणी घेऊन जर विजेचा पुरवठा घेत असेल आणि अशा ग्राहक किंवा व्यक्तिला विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा वापर केला गेला नसेल तर, वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारातील तरतूदी लागू रहाणार नाहीत.

३८.२ विनियम ३८.१ मध्ये उल्लेखलेल्या परिस्थितीमध्ये खालील विनियम लागू राहतील-

(१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम २०११ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षमता वाटपांच्या तत्त्वांच्या आधारे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला जोडणी देण्यात येईल.

(२) आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या आणि वितरण परवानाधारकाने पारेषण परवानाधारकाला कळविलेल्या दराने, पारेषण परवानाधारक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला, लागू असलेल्या पारेषण आकार, क्रॉस सबसिडी अधिभाराकरिता देयक पाठवेल.

(३) एक महिन्याच्या क्रॉस सबसिडी अधिभाराइतकी सुरक्षा अनामत ठेवण्यास वितरण परवानाधारक पारेषण यंत्रणा उपयोग कर्त्याला कळवेल;

(४) पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून वसूल केलेला क्रॉस सबसिडी अधिभार आणि लागू असलेल्या अनामतीच्या रकमा पारेषण परवानाधारक वितरण परवानाधारकाला अदा करेल;

(५) पारेषण परवानाधारकाकडे असलेल्या माहितीच्या आधारे पारेषण परवानाधारक वितरण परवानाधारकाला ग्राहकाच्या दर्जात कोणताही बदल झाल्यास, तो वितरण परवानाधारकाला कळवेल ज्यामुळे क्रॉस सबसिडी अधिभार निश्चित करताना मदत होईल;

(सहा) अधिनियमाखाली ज्या कारणांमुळे जोडणी खंडित करणे अनुज्ञेय आहे त्यापैकी कोणत्याही कारणामुळे ग्राहकाची जोडणी खंडित करण्याचा पारेषण परवानाधारकाला हक्क राहील.

(सात) वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारातील वितरण परवानाधारकावरील बंधने लागू राहाणार नाहीत

(आठ) वितरण परवानाधारकाच्या ग्राहक केवळ आंतर-राज्य पारेषण यंत्रणेवर मुक्त प्रवेश घेत असेल तर तो देखील या विनियमाखाली लागू असणारा अधिभार भरेल

(नऊ) वितरण परवानाधारकाच्या जाळ्याचा उपयोग न करता, थेट राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणी घेऊन मुक्त प्रवेश घेत असलेल्या वितरण परवानाधारकाच्या ग्राहकाला देखील या विनियमाखाली लाग़ू असणारा अधिभार भरावा लागेल

(दहा) वितरण परवानाधारकाच्या जाळ्याचा उपयोग न करता, इंटरफेजद्वारे थेट राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणी घेऊन मुक्त प्रवेश घेत असलेल्या ग्राहकांना देखील या विनियमाखाली लागू असणारा अधिभार भरावा लागेल

स्पष्टीकरण - या विनियमाच्या प्रयोजनार्थ, ''पारेषण यंत्रणा उप्योगकर्ता''' या संज्ञेचा अर्थ  महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम २०११ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्थाप्रमाणे असेल.

परंतु आणखी असे की, जर अशा सर्व मुक्त प्रवेश ग्राहकांची वीज पुरवठा घेण्याची ठिकाणे (ड्रॉअल पॉइंट्स) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला जोडलेली असतील आणि जर मुक्त प्रवेश ग्राहक, ज्या निर्मिती कंपनीची वीज पुरवठा करण्याची (इंजेक्शन पॉइंट्स) ठिकाणे आंतर-राज्य किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला जोडलेली असतील अशा निर्मिती कंपनीकाडून वीज पुरवठा घेत असतील तर त्यांना वहन आकार लागू होणार नाहीत. अशा मुक्त प्रवेश ग्राहकांना, त्यांनी पारेषण मुक्त प्रवेश विनियमांखाली ज्या पारेषण परवानाधारकाच्या जाळ्यात प्रवेश घेतला असेल अशा पारेषण परवानाधारकाला फक्त लागू असलेले पारेषण आकार, भरावे लागतील.

परंतु असे की, जर सर्व निर्मिती कंपन्यांकडे, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणा-या समर्पित वाहिन्या किंवा पारेषण वाहिन्या असतील, तर वहन आकार लागू होणार नाहीत आणि अशा समर्पित वाहिन्या किंवा पारेषण वाहिन्यांना, अधिनियमाच्या कलम २(१६) किंवा कलम २ (७२) खाली, जसे असेल तसे,  व्याख्या केल्याप्रमाणे अर्थ असेल.

## ३९. मुक्त प्रवेश कमी करण्यासाठी प्राधान्य

राज्य ग्रिडच्या कामकाजातील तांत्रिक निर्बंधांना अधीन राहून, ग्राहकांच्या मुक्त प्रवेश सेवा कमी करणे आवश्यक झाले तर, राज्य ग्रिड संहितेच्या आवश्यकतांना अधीन राहून, वितरण परवानाधारकाला देण्यात आलेला मुक्त प्रवेश सर्वात शेवटी कमी करण्यात येईल. इतरामध्ये, अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक प्रथम कमी करण्यात येतील, त्यानंतर, मध्यक-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक व त्यानंतर दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश्स ग्राहक असतील.

## ४०. विद्यमान करार

या विनियमाच्या अधिसूचनेच्या पूर्वी केलेली कोणती गोष्ट किंवा केलेली किंवा करण्यात आली आहे असे मानण्यात येणारी कोणतीही कारवाई ज्यात निर्गमित केलेल्या किंवा केलेल्या विद्यमान करार, दस्तऐवज किंवा विलेखांचा समावेश असेल आणि जे वितरण यंत्रणेच्या वापरासंबंधी असतील ते, अधिनियम किंवा या विनियमांशी विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंतच, वैध व बंधनकारक असतील.

परंतु असे की, ग्राहक त्याचा मुक्त प्रवेश कालावधी समाप्त झाल्यानंतर असा ग्राहक, वितरण परवानाधारकाच्या सर्व अन्य ग्राहकांसारखाच एक ग्राहक असल्याचे समजण्यात येईल व त्यांच्याप्रमाणेच त्याला देयके पाठविण्यात येतील, त्याच्या दर्जात कोणताही बदल होणार नाही आणि मुक्त प्रवेश कालावधीपूर्वी त्याला वितरण परवानाधारकाकडून मिळत असणाऱ्या सेवा पुरविण्यात येतील.

## ४१. वाद

१. या विनियमांखाली वितरण परवानाधारक आणि मुक्त प्रवेश घेणाऱ्या ग्राहकांमधील कोणत्याही वादावर ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाकडून अभिनिर्णय देण्यात येईल.

२. या विनियमांखाली वितरण परवानाधारक आणि वीज पुरवठादार यांच्यामधील कोणताही वादाचा आयोगाकडे किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य कोणत्याही मंचाकडे अभिनिर्णयासाठी संदर्भ करण्यात येईल.

३. समिती

(एक) आयोग ''मुक्त प्रवेश संनियंत्रण, वाद निराकरण आणि आढावा समिती'', या नावाची एक समिती स्थापन करेल. या समितीमध्ये राज्य भार प्रेषण केंद्र, संबंधित वितरण परवानाधारक, आयोगाच्या कर्मचाऱ्यांपैकी एक व्यक्ती किंवा प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी यांचा प्रत्येकी एक सदस्य राहील. ही समिती परवानाधारकाच्या कार्यक्षेत्रातील मुक्त प्रवेशाच्या प्रगतीचे संनियंत्रण करेल आणि या समितीची दर महिन्यात किमान एक बैठक होईल.

(दोन) वितरण परवानाधारक मंजूर केलेले मुक्त प्रवेश, प्रलंबित किंवा त्याने नाकारलेले अर्ज, इ. माहिती समितीला देईल.

(तीन) ही समिती मुक्त प्रवेश परवानग्यांच्या संर्दभातील वादांचे निराकरण करेल आणि बाधित ग्राहकाने किंवा अर्जदाराने विनंती केल्यास वितरण परवानाधारकाने दिलेल्या निर्णयाचा आढावा घेईल.

(चार) समिती चालू विनियमांवर आपले निरीक्षण/ सूचना प्रत्येक सहा महिन्यातून एकदा सादर करेल.

## ४२. दैवी आपत्ती

४२.१ दैवी आपत्ती म्हणजे एखादी घटना, जी वितरण परवानाधारक किंवा अर्जदार किंवा आंतर-राज्य पारेषण यंत्रणा किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा, जसे असेल तसे, यांच्या नियंत्रणाबाहेर असेल व ज्याबाबत आगाऊ कल्पना नसेल किंवा जिची वाजवी काळजी घेऊन देखील आगाऊ कल्पना येऊ शकली नसती आणि जी कराराच्या अंमलबजावणीवर मोठ्या प्रमाणात परिमाण करते. दैवी आपत्तींच्या घटनांमध्ये खालील घटनांचा समावेश होईल.

(एक) नैसर्गिक आपत्ती जी केवळ पूर, वादळ, दुष्काळ, भूकंप आणि साथीच्या रोगांपुरतीच मर्यादित नसेल;

(दोन) युद्ध (घोषित किंवा अघोषित), बंड, आक्रमण, शस्त्र-संघर्ष किंवा परकीय शत्रूची कृती ज्यात भारताचा संबंध असेल किंवा भारतावर थेट परिणाम होणारा असेल, भारतामधील क्रांती, दंगल, उठाव, अन्य नागरी असंतोष, अतिरेकी किंवा घातपाताच्या कारवाया;

(तीन) अणु-स्फोट, किरणोत्सर्गी अथवा रासायनिक प्रदुषण किंवा आयोनाइझिंग किरणोत्सर्जन ज्याचा, निर्मिती केंद्रावर, स्व-वापरासाठीच्या निर्मिती केंद्रावर किंवा ग्राहकावर, आंतर-राज्य पारेषण यंत्रणा किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा किंवा अन्य कोणतीही सुविधा किंवा यंत्रणा- जी या कराराच्या अंमलबजावणीसाठी महत्वाचा आणि आवश्यक भाग असेल- यांच्यावर, थेट परिणाम होतो;

(चार) वर नमूद केलेल्या घटनेसारखी असणारी भारतात घडणा-री अन्य कोणतीही घटना किंवा परिस्थिती.

परंतु असे की, वरील विनियम ४२.१ मध्ये उल्लेखलेली दैवी आात्तीची घटना घडल्यामुळे, मुक्त प्रवेश करारातील एक पक्षकार असणारी व्यक्ती जर, अशा करारातील किंवा या विनियमातील कोणतेही बंधन पूर्णतः किंवा अंशतः आणि वेळेवर व त्यात असलेल्या आश्यकतेप्रमाणे, पालन करण्यास समर्थ नसेल तर, या विनियमांना अधीन राहून, वरील बंधनाचे पालन, बाधित व्यक्तीची क्षमता अशा दैवी अपत्तीच्या घटनेमुळे बाधित राहील त्या मर्यादेपर्यंत स्थगित ठेवण्यात येईल.

परंतु असे की, अशी दैवी अपत्तीची घटना घडल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत ती घडल्याचे करारातील एक पक्षकार दुसऱ्या पक्षकाराला कळवेल.

## ४३. सूट

या विनियमात काहीही नमूद करण्यात आले असले तरी ते नियत दिनांकापूर्वी वीज वितरणाचा व्यवसाय करीत असलेल्या स्थानिक प्राधिकरणाला लागू राहणार नाही.

## ४४. दूरुस्ती करण्याचे अधिकार

अधिनियमांतील तरतूदींना विसंगत नसणारे बदल, फेरफार, फेरबदल, किंवा सुधारणा या विनियमांतील कोणत्याही तरतूदींमध्ये आयोग कोणत्याही वेळी करु शकेल.

## ४५. अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमांतील तरतूदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, आयोग, सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक किंवा योग्य वाटेल, परंतु अधिनियमांमधील तरतूदींशी विसंगत नसतील, अशा तरतूदी करु शकेल.

## ४६. रद्द करणे आणि अपवाद

४६.१ या विनियमात नमूद केलेल्या बाबी वगळून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून रद्द होतील.

४६.२ हे विनियम रद्द करण्यात आले असले तरी, या रद्द केलेल्या विनियमांखाली करण्यात आलेली किंवा केली आहे असे मानण्यात येणारी कोणतीही कारवाई ही या विनियमांखाली करण्यात आली आहे किंवा केली आहे असे मानण्यात येईल.

४६.३ हे विनियम अमलात येण्याच्या दिनांकापूर्वी प्रचलित असलेल्या करार किंवा संविदेखाली राज्यातील वितरण यंत्रणेतील मुक्त प्रवेश ग्राहकांना, अशा प्रचलित करार/ संविदेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या त्याच अटी व शर्तींना अनुसरुन, वितरण यंत्रणेमध्ये असा प्रवेश चालू ठेवण्याचा हक्क राहील. असा प्रचलित करार/ संविदा समाप्त झाल्यानंतर, या विनियमांखाली, अशा व्यक्ती दीर्घ-कालीन प्रवेश किंवा मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश घेण्यास पात्र असतील.

परंतु असे की, आयोगाने या विनियमाखाली निश्चित केलेला वहन आकार, क्रॉस सबसिडी अधिभार, अतिरिक्त अधिभार, स्टँड-बाय आकार किंवा अन्य कोणताही आकार सर्व मुक्त प्रवेश ग्राहकांना लागू राहील.

४६.४ या विनियमांत काहीही नमूद करण्यात आले असले तरी, त्यामुळे वीज निर्मिती करीत असलेल्या कोणताही परवानाधारक किंवा ग्राहक किंवा व्यक्ती किंवा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात जागा असलेल्या व्यक्तिला, या विनियमांच्या अधिसूचनेच्या पूर्वी किंवा त्यानंतर,

मुक्त प्रवेश मिळण्यासाठीच्या कोणत्याही किंवा सर्व शर्ती लागू करण्यातून, त्यासंबंधीची कारणे देऊन लेखी आदेशाद्वारे सूट देण्याचे आयोगाचे अधिकार अवैध ठरणार नाहीत;

परंतु असे की, आयोग अशी सूट देण्यापूर्वी, व्यवहार्य असेल तितकी, कोणत्याही स्वारस्य असलेल्या किंवा बाधित पक्षकाराला त्याचे म्हणणे मानण्याची संधी आयोग देईल.

४६.५ या विनियमांत काहीही नमूद करण्यात आले असले तरी त्यामुळे, न्याय देण्यासाठी किंवा आयोगाच्या कार्यपद्धतीचा दूरुपयोग टाळण्यासाठी आवश्यक असतील असे आदेश पारित करण्याच्या आयोगाच्या अंगभूत अधिकारांवर मर्यादा येणार नाही किंवा अन्यथा त्यांच्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.

४६.६ या विनियमांत काहीही नमूद करण्यात आले असले तरी त्यामुळे, एखाद्या प्रकरणातील किंवा एखाद्या वर्गातील प्रकरणे हाताळताना त्यासंबंधातील विशेष परिस्थिती विचारात घेऊन आयोगाला जर अशा प्रकरणांच्या बाबतीत, या विनियमांतील कोणत्याही तरतुदीशी विसंगत असणारी परंतु अधिनियमांतील तरतुदींना अनुसरुन असणारी एखादी कार्यपद्धती स्वीकारण्यास, बाधा येणार नाही.

४६.७ या विनियमांत काहीही स्पष्टपणे किंवा सूचितपणे नमूद केले असले तरी त्यामुळे, ज्यासाठी कोणतेही विनियम करण्यात आलेले नाहीत, असे कोणतेही प्रकरण हाताळताना किंवा अधिनियमातील अधिकारांचा वापर

करताना बाधा येणार नाही आणि आयोग अशी प्रकरणे, अधिकार आणि कार्ये त्यास योग्य वाटेल अशारितीने हाताळेल.

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,

दिनांक     २०११
-